परंपरा

अत्रि × अनुसूया

↓

श्रीदत्तात्रेय

↓

आपळराज सुमती

↓

श्रीपादवल्लभ

↓

माधव × अंबा

↓

श्रीमन्नृसिंहसरस्वती

↓

गणेश × रमाबाई

↓

प प श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती

- श्री रंगावधूत स्वामी
- श्री नाना महाराज
- श्री योगानंद सरस्वती स्वामी
- श्री धुंडिराज महाराज
  - श्री काजळकर महाराज
    - सौ ताईमहाराज
- श्री गुळवणी महाराज
  - श्रीदत्त महाराज
- श्री दीक्षित स्वामी
- श्री सीताराम महाराज
- श्री गोविंद महाराज

श्रीगणेशदत्तगुरुभ्योनमः

भारतामध्ये श्रीदत्तसांप्रदायाचा विशेष करुन महाराष्ट्रात जास्त प्रभाव आढळतो. श्रीदत्तसांप्रदायाचा प्रमुख ग्रंथ श्रीगुरुचरित्र अनेक घरात वाचला जातो. त्या नंतर कर्नाटकाच्या व आंध्रप्रदेशाच्या कांही भागातही दत्तभक्ती पहायला मिळते. प. प. श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी संपूर्ण भारतभर पायी संचार करुन सर्वत्र विशेषतः एकमुखी श्रीदत्त देवतेची स्थापना केली. श्रीदत्तपुराणाची रचना करुन श्रीदत्तात्रेयांच्या अवतारकार्याचा असेतु हिमाचल परिचय करुन दिला. श्रीदत्तात्रेय आणि त्यांनी पुढे घेतलेले दोन अवतार हे श्रीगुरु अवतार आहेत. ह्यांचे वैशिष्टय म्हणजे हे तीनही अवतार ज्ञानदान देणारे गुरु अवतार असल्याने इतर ईश्वरी अवतारांप्रमाणे त्यांची समाप्ती झालेली नाही. कारण ज्ञानदानाचे कार्य कांही एका विशिष्ट कालापुरते मर्यादित नाही. ते अखंड चालणारे आहे मग कोणतेही युग का असेना ! इतर श्रीरामकृष्णादि अवतार असुरांचा नाश करण्याकरता झाले आणि ते कार्य झाल्यावर अवतार समाप्ती झाली तसे श्रीदत्तसांप्रदायातल्या अवतारांचे नाही. हे अवतार अभक्तांना अव्यक्त आहेत. किंवा सामान्य जीवांचा उद्धार करण्यासाठी पुन्हा पुन्हा देह धारण करतात.

श्रीदत्तसांप्रदायाची परंपरा श्रीदत्तात्रेयांपासून सुरु होते. याची विस्तृत माहिती श्रीगुरुचरित्रात आलेलीच आहे. ज्यांनी ते वाचलेले नाही त्यांना त्याची थोडक्यात माहिती पुढे दिली आहे.

# श्रीदत्तात्रेय

ब्रम्हा, विष्णु आणि महेशांनी अत्रि अनसूयेच्या पोटी श्रीदत्तात्रेयांनी जन्म घेतला. अत्रि ऋषी हे ब्रम्हदेवांचे मानसपुत्र. अनसूया ही कर्दम व देवहुतींची कन्या. श्रीदत्तात्रेय अवताराचे विस्तृत चरित्र प. प. श्रीमत्‌वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी श्रीदत्तपुराण संस्कृत व मराठीत श्रीदत्तमहात्म्यात वर्णन केलेले आहे. सहस्त्रार्जुन, परशुराम, अलर्क, आयु, यदु, प्रल्हाद वगैरे श्रीदत्तात्रेयांचे मोटे भक्त होऊन गेले. कार्तवीर्याने स्मरण भक्ती केली तर अलर्काने वंदन भक्ती. आयुराजाने दास्य भक्ती केली. तर सख्य भक्ती परशुरामाने केली. विष्णुदत्ताने श्रीदत्तात्रेयांची सेवा केली. वेदधर्माने किर्तन भक्ती केली तर दीपकाने श्रवण भक्ती. हा श्री गुरु अवतार असल्याने आपल्या भक्तांना त्यांनी ज्ञान दिले.

# श्रीपादवल्लभ

आंध्रप्रदेशात राजमहेंद्री शहराजवळ पीटापूर नांवाचे गांव आहे. तिथे आपळराज व सुमती नांवाचे अत्यंत सत्शील दांपत्य राहात होते. एकदा त्यांच्याकडे श्राद्ध चालू असताना श्रीदत्तात्रेय भिक्षा मागण्याच्या निमित्ताने तिथे गेले. भिक्षा हे फक्त निमित्त होते. खरा उद्देश त्यांच्या धर्माचरणाचे फळ देणे, त्या दोघांवर कृपा करण्याचा होता. श्राद्धाचे ब्राम्हण जेवण्यापूर्वी तिने अतिथि धर्मचि पालन करुन श्रीदत्तात्रेयांना भिक्षा घातली त्यामुळे ते प्रसन्न होऊन त्यांनी वर माग असे सांगितले असता तिने त्यांच्याच सारखा पुत्र व्हावा असा वर मागितला. श्रीदत्तात्रेयांनी ''तथास्तु'' म्हटले आणि ते गेले. त्यांच्यासारखा पुत्र व्हायचा म्हणजे त्यांनाच तिच्या पोटी जन्म घ्यायला पाहिजे कारण त्यांच्यासारखा दुसरा कोणी असूच शकत नाही. त्याप्रमाणे भाद्रपद शु. ४ च्या दिवशी श्रीदत्तात्रेयांनी सुमतीच्या पोटी पहाटेच्या वेळी जन्म घेतला. त्यांचे श्रीपादवल्लभ असे नांव टेवण्यात आले. बालपणापासूनच त्यांच्या विद्वत्तेमुळे लोक प्रभावित झाले. लवकरच त्यांनी आपल्या लोकोद्धाराच्या कार्याला आरंभ करण्यासाटी संचाराला बाहेर पडायची इच्छा व्यक्त केली. सुमतीला वाईट वाटले. तिला आधी दोन अपत्ये होती ती अपंग होती. हा चांगला मुलगा सोडून गेला तर आपले कसे होणार असे स्त्रीसुलभ विचार तिच्या मनांत आले. श्रीपादांनी आपली कृपादृष्टी त्या दोघांवर टाकताच त्यांना उत्तम आरोग्य आणि ज्ञान मिळाले. तसेच तिने श्रीपादांनी विवाह करावा अशीही इच्छा प्रदर्शित केली. आईची समजूत काढताना श्रीपादांनी त्यांच्या अवतार कार्याची तिला कल्पना दिली, योगश्रीशी आपला विवाह झाल्याने लौकीक विवाहाचा त्यांच्याबाबतीत प्रश्नच येत नाही. वगैरे तिला

समजावले आणि ते तीर्थाटनाकरता बाहेर पडले. सर्व तीर्थ क्षेत्रे पाहून ते गोकर्ण महाबळेश्वरला आले . जे साधक, उपासक, जिज्ञासू असतात त्यांना मार्गदर्शन करण्याकरता अवतारी पुरुष अशा ठिकाणी येऊन कांही काळ वास्तव्य करतात. त्यांच्या वास्तव्यामुळे त्या क्षेत्राचेही माहात्म्य वाढते. गोकर्ण महाबळेश्वरमध्ये त्यांनी एका पतित स्त्रीचा उद्धार केला. कांही काळ राहून श्रीपादवल्लभ कुरवपूरला आले.

हे स्थान कर्नाटकातच्या रायचूर जिल्ह्यात कृष्णा नदीमध्ये असून याच्या चारही बाजूंनी कृष्णेचा प्रवाह वाहातो. इथे जाण्याकरता मुंबई - चेन्नई रेल्वे मार्गावरच्या रायचूर स्टेशनवर उतरुन बसने आदुकूरमार्गे यापलदिन्नीला जावे. तिथून कोळी लोक वाटाडे म्हणून मिळतात. त्यांच्याबरोबर कुरवपूरला जाता येते.

इथल्या वास्तव्यात एक परिट श्रीपादवल्लभांची मनोभावे सेवा करीत असे. एकदा तिथला राजा आपल्या सर्व लवाजम्यासह तिथे जलक्रीडा करण्याकरता येतो. त्याचे ते वैभव पाहून या गरीब परिटाच्या मनांत येते की तो राजा किती भाग्यवान। श्रीपादवल्लभांना ते समजते. ते त्याला त्याची इच्छा विचारतात तेव्हां प्रथम तो श्रीपादांचे चरण न सोडता सेवा करीत राहायची इच्छा बोलून दाखवतो पण जेव्हां श्रीपादवल्लभ परत खोदून खोदून विचारल्यावर तो कबूल होतो. श्रीपादवल्लभ त्याला, तूं राजा हो, असे म्हणताच तो म्हणतो, आता मी या वृद्धावस्थेत राजा होऊन काय करु ? तेव्हां श्रीपादवल्लभ त्या ''पुढच्या जन्मात तूं बीदरचा बादशाहा होशील'' असा आशीर्वाद देतात. त्या प्रमाणे तो पुढे बीदरचा बादशाहा होतो. त्याच गांवातली एक स्त्री आपल्या मुलासह नदीत आत्महत्या करायला येते. तिचा पती निवर्तल्यानंतर तिच्या मूर्ख मुलाला गांवातले लोक जीवन असह्य करतात. श्रीपाद तिला बोलावून आत्महत्या करण्यापासून परावृत्त करतात आणि दोघांचेही कल्याण व्हावे म्हणून शनीप्रदोषाचे व्रत करण्यास सांगतात. ती मनोभावे श्रीपादांनाच साक्षात शंकर मानून त्यांची पूजा करते. श्रीपाद

प्रसन्न होऊन तिला वर माग म्हणताच सुमतीप्रमाणे तीही त्यांना त्यांच्यासारखा मुलगा व्हावा असा वर मागते. तिला केलेल्या कर्माचे फळ द्यायलाच हवे म्हणून श्रीपाद तिला तो वर तर देतातच पण हा मुलगाही आपल्या कृपादृष्टीने ज्ञानी करतात. पुढे श्रीपादवल्लभ अव्यक्तरुपाने कार्य करायचे ठरवून आश्विन वद्य १२ला लौकिक दृष्टया अदृष्य होतात. पण ते अव्यक्त रुपात गेल्यानंतरही कार्य करताहेत याचे उदाहरण म्हणजे पुढे जवळच्या गांवातला श्रीपादांचा एक व्यापारी भक्त असा नवस करतो की मला व्यापारात जर नफा झाला तर मी कुरवपूरला येऊन अन्नदान करीन. त्याप्रमाणे श्रीपादांच्या कृपेने त्याला नफा होतो आणि तो नवस पूर्ण करण्याकरता कुरवपूरला यायला निघतो. वाटेत चोर त्याला लूटून ठार मारतात त्या वेळी स्वतः श्रीपाद प्रगट होऊन त्याला जिवंत करतात. म्हणजे अव्यक्त रुपानेही त्यांचे कार्य चालू आहे. आजही अनेक भक्त कुरवपूरला जाऊन आपल्या मनोकामना पूर्ण करुन घेत असतात.

# श्रीनृसिंहसरस्वतीस्वामी महाराज

श्रीपादवल्लभांनी दिलेल्या वराप्रमाणे कुरवपूरमधल्या त्या स्त्रीने विदर्भातल्या कारंजा गांवात जन्म घेतला. तिचे नांव अंबा. पूर्व संस्काराप्रमाणे बालपणापासूनच तिचा ईश्वरभक्तीकडे ओढा होता. पुढे योग्य वयात तिचा माधव नांवाच्या सत्शील ब्राम्हणाशी विवाह झाला आणि त्यांच्या पोटी श्रीपादवल्लभांनी पौष शु २ ला अवतार ग्रहण केला. त्यांचे नांव नृहरि असे टेवण्यात आले. आपल्याला मुलगा झाल्याचा आनंद फार टिकला नाही कारण हा मुलगा कांही बोलेच ना. सर्व उपाय करुनही कांही उपयोग होईना तेव्हां आईवडिलांच्या दुःखाला सीमाच राहिली नाही. शेवटी नृहरिने (नरहरि) खुणेने आईला सांगितले की त्याची मुंज केली तर तो बोलू लागेल. आता मुंज करायला पैसा कुटून आणणार१ तोही प्रश्न नरहरिनेच सोडवला. त्याने आपल्या सामर्थ्याची चुणूक दाखवली. घरातल्या एका लोखंडी पळीला आपल्या बोटाचा स्पर्श करताच तिचे सोन्यात रुपांतर झाले. मग आईवडिलांनी मोटया हौसेने त्याची मुंज केली. आजपर्यंत ओंकाराशिवाय एक अक्षर न उच्चारणाऱ्या नरहरिने आईने मुंजीत पहिली भिक्षा वाढताच अग्निमिळे --- हा वेदमंत्रच म्हणायला सुरवात केली. सगळे आश्चर्य चकित होऊन गेले. वयाने लहान असूनही त्याची विद्वत्ता पाहून अनेक विद्वान त्याच्याकडे ज्ञानग्रहण करण्याकरता येऊ लागले. लवकरच नरहरिने लोकोद्धाराकरता संन्याश्रम स्वीकारुन संचारार्थ बाहेर पडण्याचा विचार आईला सांगितला. इतक्या लहान वयात आपला एकुलता एक मुलगा आपल्याला सोडून जाणार हा विचारच तिला सहन होईना. तिने त्याला

सांगितले की संन्यास असा इतक्या लहान वयात घेता येत नाही. ब्रम्हचर्याश्रिम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि मग संन्यासाश्रम अशा क्रमाने जाण्यास शास्त्र सांगते आणि तूं असा कसा संन्यास घेणार १ यावर नरहरिने तिला समजावले, ''ज्याला आपल्याला उदंड आयुष्य आहे अशी खात्री आहे त्याने त्या क्रमाने जावे. पण इथे आपल्याला पुढच्या क्षणाचा भरवसा नाही. आपले आयुष्य वाळलेल्या पानाप्रमाणे आहे कधी गळून पडेल सांगता येत नाही. मृत्यु आपल्या भोवती सतत घिरट्या घालीत असतो. तेव्हां आत्मोद्धार करायचा असेल तर लहान वयातच अभ्यासाला सुरवात केली पाहिजे. दुसरे असे की तो क्रम सामान्य जनांकरता आहे.'' शेवटी आईने एक अट घातली की जेव्हां तिला अजून दोन मुले होतील तेव्हांच नरहरिने जावे. ती मान्य करुन नरहरि थांबला. आणि आईला दोन मुले होताच नरहरि संचारार्थ बाहेर पडला. आईच्या समाधानाकरता तिला त्याने वचन दिले की परत कांही वर्षांनी येऊन ते तिला दर्शन देऊन जातील.

कारंज्याहून संचार करीत नरहरि काशीला येऊन पोहोचले. आता आपण त्यांना दत्तप्रभु म्हणू. दत्तप्रभुंचे शुद्ध धर्माचरण पाहून काशीतल्या वृद्ध संन्याशांनी त्यांना प्रार्थना केली, ''महाराज। कलीयुगात संन्यासधर्माचा लोप झाला आहे. आपण संन्यास धर्माचा स्वीकार करुन त्याचा आदर्श सर्वांसमोर टेवावा म्हणजे त्याची परत स्थापना होईल आणि आम्हालाही आपल्याला वंदन करता येईल.'' त्या प्रार्थनेप्रमाणे दत्तप्रभुंनी तपोवृद्ध अशा कृष्णसरस्वतींकडून संन्यासदीक्षा ग्रहण केली. आता दत्तप्रभु जगद्गुरु झाले. तिथून संचार करीत ते आईला दिलेल्या वचनाप्रमाणे कारंज्याला आले. गावांतल्या सर्वांना अतिशय आनंद झाला. घरोघरी प्रेमाने बोलावून त्यांची पूजा केली. दत्तप्रभुंनी आईला सांगितले ''जेव्हा तूं माझे स्मरण करशील तेव्हां तुला माझे दर्शन होईल.''

(दत्तप्रभुंचा जन्म ज्या वाड्यात झाला तो वाडा सध्या घुडे वाडा म्हणून ओळखला जातो. ते जन्म स्थान कारंज्याच्या श्रीदत्तमंदिराच्या मागच्या बाजूस असून अजूनही सुस्थितीत आहे. दत्तप्रभुंचे वंशज काळे आडनांव लावतात. त्यांच्यापैकी एक कुटुंब नागपूरमध्ये आहे तर दुसरे काशीत असे प.पू.श्रीच्याकडून समजले.)

तिथून संचार करीत शिष्य संग्रह करीत दत्तप्रभु औदुंबरला येऊन एक वर्षभर राहिले. तिथून श्रीक्षेत्रअमरापूर येथे आले. हे स्थान सध्याच्या नरसोबावाडीच्या समोरच्या किना-याला आहे. इथे सुमारे १२ वर्ष राहून दत्तप्रभुंनी अनेक लीला केल्या. नंतर भक्तांकरता औदुंबर वृक्षाखाली आपल्या मनोहर पादुकांची स्थापना करुन इथून ते गाणगापूरला गेले. पण गाणगापूरला गेले म्हणजे वाडीत नाहीत असे नाही. कारण इथेही गेली ५०० वर्ष लोकांना अनुभव येताहेत, त्यांच्या मनोकामना पूर्ण होताहेत. इथे श्रीनारायणस्वामी, श्रीगोपाळस्वामी, श्री मौनीस्वामी, श्रीरामचंद्रयोगी असे अनेक थोर संत महात्मे राहून गेले. प.पू.श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांचे वाडीवर फार प्रेम होते. वारंवार ते वाडीत येऊन राहात. त्यांचे अधिकारी शिष्य श्रीदीक्षितस्वामी महाराजांनी प्रदीर्घ काळ वाडीतच वास्त्व्य केले. नंतर अमरापूरला जाऊन श्रीवासुदेवपीटाची स्थापना केली. तिथेच आता भव्य वास्तू उभी राहिली आहे. श्रीवक्रतुंडमहाराज व श्रीधुंडिराजमहाराज यांचे वाडीत दीर्घकाल वास्तव्य होऊन त्यांना श्रीवासुदेवानंद सरस्वतींचा पवित्र सहवास इथे मिळाला, श्री वर्षातून दोन वेळा नारायणस्वामींच्या पुण्यतिथी उत्सवाला आणि गुरुद्वादशीला वाडीत जाऊन पुराणसेवा करीत असत.

१. गाणगापूरमध्ये दत्तप्रभुंचे सर्वांत जास्त काळ वास्तव्य झाले आहे. इथे अनेक लीला झाल्या. असंख्य जीवांचा उद्धार झाला. श्रीपादवल्लभांच्या रुपाने दत्तप्रभुंनी ज्या रजकाला ''तूं पुढच्या जन्मी राजा होशील'' असा वर दिला होता तो या जन्मांत बीदरचा बादशहा झाला. तो जरी यवन असला तरी पूर्व संस्कारानुसार वैदिक धर्माचा आदर करीत असे. त्याला त्वचा रोग झाल्यावर इतर कोणत्याही उपायांनी तो बरा होईना

तेव्हां त्याने त्याच्या राज्यातील ब्राम्हण पुरोहितांना उपाय विचारल्यावर त्यांनी त्याला दत्तप्रभुंच्या दर्शनाला जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे तो गाणगापूरला आला. दत्तप्रभुंनी त्याला भेटताक्षणीच गेल्या जन्मीचे स्मरण करुन दिले. आपल्या कृपादृष्टीने त्याचा स्फोटक बरा केला. त्यानेही मोटया प्रेमाने दत्तप्रभुंना आपल्या राजधानीत नेऊन कुटुंबीयांना त्यांचे दर्शन घडवले. नंतर त्याला दत्तप्रभुंनी मुलाच्या ताब्यात राज्य देऊन श्रीशैल पर्वतावर येऊन भेटण्यास सांगितले.

२. ज्या प्रमाणे श्रीपादवल्लभ कुरवपूरमध्ये अदृष्य झाले त्याप्रमाणे दत्तप्रभु गाणगापूरमधून लौकिक दृष्टया अदृष्य झाले आणि श्रीशैलपर्वतावर जाऊन राहिले. वाडीप्रमाणेच ते आजही गाणगापूरमध्ये अव्यक्तरुपाने आहेत. अदृष्य होण्यापूर्वी त्यांनी आवर्जून सांगितले की त्यांना गायन भक्ती अत्यंत प्रिय आहे आणि ज्या स्थानात गायनभक्ती तसेच श्रीगुरुचरित्राचे वाचन होत असते ते स्थान त्यांना अतिशय प्रिय आहे. तसेच ज्याचा जसा भक्तीभाव असेल त्याच्यापाशी मी तसा तसा असेन असे दत्तप्रभुंनी वचन दिले आहे.

# प.प. श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती

पूर्वाश्रमीचे नांव : वासुदेव गणेश टेंबे

माता : रमाबाई

पिता : गणेशभट्ट

जन्म : श्रावण वद्य पंचमी शके १७७६ इस. १८५४

स्थळ : माणगांव, सावंतवाडी, महाराष्ट

समाधी : आषाढ शुद्ध प्रतिपदा, मंगळवार रात्रौ २४ जून १९१४
गरुडेश्वर, गुजरात

कार्य : आदि शंकराचार्यप्रमाणे संपूर्ण भारतभर पायी प्रवास
प्रवास करुन वैदिक धर्माचेपुनरज्जीवन केले.

कार्यक्षेत्र : अखिल भारतवर्ष

वाङ.मय निर्मिती : १. श्रीदत्तमाहात्म्य

२ द्विसाहस्त्री

३ श्रीदत्तचंपू

४ श्रीदत्तपुराण

५ श्रीसप्तशतीगुरुचरित्रसार

६ दत्तलीलामृताब्धिसार

७ स्तोत्रादि संग्रह

८ शिक्षात्रयम्

९ मननसार

१० गुरुसंहिता

११ दत्तलीलामृताब्धिसार

१२ स्त्रीशिक्षा

१३ पंचपाक्षिक

अनेक वर्ष पिताजीनी गाणगापूरला जाऊन सेवा केल्यावर श्रीदत्तप्रभुंच्या कृपाप्रसादाने महाराजांचा जन्म झाला. तीन वर्षांचे झाल्यावर त्यांनी अध्ययनाला प्रारंभ केला. आठव्या वर्षी उपनयन झाल्यावर महाराजांनी संध्योपासना, अग्निसेवा व श्रीगुरुचरित्र वाचनांस प्रारंभ केला. वेदाध्ययन तात्या उकिडव्यांकडे झाले. अत्यंत कडकडीत आचरण, अढळ मातृभक्ती. बालवयांतच मंत्रसिद्धी प्राप्त झाली जिचा उपयोग त्यांनी दुःखी जीवांना आधार देण्यासाटी, दुःखमुक्त करण्यासाटी केला. लहानपणापासूनच त्यांना दत्तप्रभुंच्या आज्ञा होत व त्याप्रमाणे ते वागत. ते जेव्हां प्रथम वाडीला गेले तेव्हां त्यांची गोविंदस्वामींशी दत्तप्रभुंनी भेट घडवून आणली व त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले. सुरवातीपासूनच त्यांनी निरनिराळी व्रते केली. दुस-या वाडीच्या भेटीत त्यांना साक्षात् दत्तप्रभुंनी स्वप्नात येऊन मंत्र दिला त्याचे पुढचे सगळे विधान गोविंदस्वामींनी सांगितले. गोविंदस्वामींनी त्यांना मौनी स्वामींच्या दर्शनास नेले. पुढे लगेच दत्तप्रभुंनी त्यांना सांगितले की माणगांवात मंदिर बांधावे त्यांना सात वर्ष तिथे येऊन वास्तव्य करायचे आहे. त्याप्रमाणे माणगांवला यायला निघाल्यावर वाटेत कागलच्या एका सोनाराने दत्तप्रभुंच्या आज्ञेने सुंदर मूर्ति तयार करुन दिली. माणगांवला आल्यावर महाराजांनी स्वतः बांधकामाच्या सेवेत भाग घेतला. तिथे वाडी, गाणगापूर प्रमाणेच सर्व उत्सव होत असत. पुढे सात वर्ष झाल्यावर दत्तप्रभुंच्या आज्ञेने महाराजांनी सर्व कांही तिथेच सोडून पत्निसह माणगांव सोडले व वाडीला आले. तिथे आल्यावर त्यांना पुत्रप्राप्ती झाली पण तो लगेच गेला. इथे त्यांच्या पत्नीला दत्तप्रभुंच्या कृपेने आत्मसाक्षात्कार झाला. नंतर श्रीआज्ञेने ते संचाराला बाहेर पडले. गंगाखेडला पत्निचे निधन झाल्यावर त्यांनी संन्यास घेतला. श्रीमत् आदिशंकराचार्यप्रमाणे त्यांनी असेतुहिमाचल वेदांत जीवनदृष्टीद्वारा भारतीय धर्मदृष्टीचे पुनरुज्जीवन, संवर्धन, संघटन केले. समाजाला ज्ञानदृष्टी दिली. वैदिकाचार प्रतिष्टापक असे जे श्रीस्वामीमहाराजांचे प्रत्यक्ष व वाङ्मयीन रुप आहे ते आजच्या धर्मावनतीच्या काळांत धर्माचरणाची प्रभावी प्रेरणा देणारेच व आदर्श धर्मचे प्रबोधन करणारे आहे. पुरुषार्थ

प्राप्तीसाटी प्रयत्न करणा-या मुमुक्षू साधकांना महाराजांची दृष्टी पथदर्शक आहे. मोक्षप्राप्ती ही त्याची फलश्रुती आहे. निरनिराळया टिकाणी त्यांचे २४ चातुर्मास झाले. शेवटी गरुडेश्वरला राहून तिथेच नर्मदा तीरावर समाधि घेतली. गरुडाने शिवाला प्रसन्न करुन घेण्यासाटी इथे तप केले म्हणून या स्थानाला गरुडेश्वर असे नांव पडले.

त्यांनी देह टेवण्यापूर्वी केलेला उपदेश :-

मुक्तीचा लाभ करुन घेणे हे मनुष्य जन्माचे कर्तव्य आहे. त्या करता प्रथम मन स्थिर व्हावे या उद्देशाने वर्णाश्रमविहित धर्माचे यथाशास्त्र आचरण झाले पाहिजे. वेदांताचे श्रवण, मनन, निदिध्यासन नित्य करावे. मुख्यतः लक्षपूर्वक श्रवणाने मनांतील आसक्ती कमी होईल. सात्विक प्रवृत्तीनेच मानवाची उन्नती होते. सात्विक प्रवृत्ती होण्याकरता आहार हा हित, मित व मेध्य म्हणजे पवित्र असण्याकडे लक्ष दिले पाहिजे. आपली प्रकृती सात्विक झाल्याची खूण म्हणजे स्वधर्मावर दृढ श्रद्धा बसून स्नान देवपूजा पंचमहायज्ञ हे वेळेवर करणे, अतिथी सत्कार, गोसेवा, मातापितरांची सेवा हे हातून घडणे, कथा, किर्तन, भजन पुराण यांचे श्रवण होणे, सर्वांबरोबर गोड बोलणे, दुस-याचे नुकसान होईल असे न वागणे, स्त्रियांनी सासरी राहून सासू, सासरे व इतरही वडिल माणसे यांच्या आज्ञेत राहून पतीची दृढ निष्टेने सेवा करणे इ. गुण आपल्यामध्ये येणे. उदर निर्वाहाकरता व्यापार, शेती, नोकरी, कोणताही व्यवसाय केला तरी वेदविहित कर्म व गुर्वाज्ञा पालन कधीही सोडू नये. स्वकर्म केले तरच अंतःकरण शुद्ध होते. अंतःकरण शुद्ध झाले तरच उपासना स्थिर होते. उपासना स्थिर झाली तरच मनाला शांति मिळते. आणि मनाची गडबड थांबली म्हणजे आत्मज्ञान होऊन मोक्षाचा लाभ होतो. या प्रमाणे जो वागेल तो शेवटी पूर्ण सुखी होईल.

महाराजांच्या वाङ्मय संपदेचा थोडक्यात परिचयः-

समश्लोकी गुरुचरित्र – मूळ मराठी गुरुचरित्राचे महाराजांनी केलेले संस्कृत भाषांतर. याचा मुख्य उद्देश गुरुचरित्र संस्कृत भाषेत केल्यामुळे असेतुहिमाचल कोणालाही वाचता यावे.

द्विसाहस्त्री – समश्लोकीचेच तत्वज्ञान केवळ दोन हजार श्लोकांत सांगणारा ग्रंथ. यावर टीकाही लिहिली आहे. संहिये यं द्विसाहस्त्री असे या ग्रंथाचे श्रेष्टत्व प्रत्यक्ष भगवान् दत्तात्रेयांनीच श्री महाराजांना सांगितले आहे. हा एक ग्रंथ जरी साक्षेपाने समजावून घेतला तरी भारतीय तत्वज्ञानाचा विशेषतः अद्वैत जीवनदृष्टीचा मर्मग्राही परिचय जिज्ञासू साधकाला होऊ शकतो. या ग्रंथाची अपूर्वता अनेक रीतीने सांगता येईल. दत्तप्रभुंच्या आज्ञेनेच माणगांवात हा निर्माण झाला.

सप्तशती – समश्लोकीवर आधारित ७०० श्लोकांचा मराठी भाषेत लिहिलेला छोटासा प्रसादिक ग्रंथ. विशेषतः स्त्रियांना श्रीगुरुचरित्र वाचण्याची सोय या ग्रंथामुळे झाली आहे. याचा विशेष म्हणजे प्रत्येक ओळीतले तीसरे अक्षर उभे वाचत गेले तर गीतेचा १५ वा अध्याय तयार होतो.

त्रिशती काव्य – सप्तशतीप्रमाणेच गुरुचरित्र ३०० श्लोकांत सांगणारा छोटा संस्कृत ग्रंथ याचे वैशिष्ट म्हणजे एकीकडे हे श्रीगुरुचरित्राचे सार आहे तर दुसरीकडे संस्कृत शिकणा-या विद्यार्थ्यांना याचा व्याकरणाच्या दृष्टीने उपयोग होईल अशी रचना महाराजांनी केली आहे.

श्रीदत्तपुराण – दत्तदेवतेचा संपूर्ण इतिहास सांगणारा हा ग्रंथ म्हणजे महाराजांची स्वतंत्र निर्मिती असून संस्कृतामध्ये आहे. या ग्रंथाची प्रासादिक रचना, मंत्रमयता, रचनासौष्टव आणि समृद्ध तत्वचिंतन लक्षात घेता

याची तुलना श्रीमद् भागवताशीच करता येईल. श्रुतिस्मृतिपुराणोक्त चतुर्विध पुरुशार्थ संपन्न जीवन दृष्टीने प्रबोधन हे या ग्रंथाचे प्रयोजन आहे. त्यात ज्ञान, कर्म, भक्ती आणि योग चार मोक्षमार्गाचे साक्षेपी विवचन आले आहे.

श्रीदत्तमाहात्म्य – दत्तपुराणातील उपासनाकांडावर आधारित असा हा प्रासादिक ग्रंथ अतिशय सुबोध व सोप्या मराटी भाषेत आहे. औपनिषदज्ञान आणि श्रीदत्तात्रेयांची व परब्रहांची एकरुपता सर्व सामान्यांना समजावी म्हणून याची रचना झाली आहे. कोणालाही याचे पारायण किंवा सप्ताह करुन मनोकामना पूर्ण करुन घेता येते. याचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे दत्तप्रभुंनी या ग्रंथात आपले सान्निध्य टेवावे असे महाराजांनी दोन हात पसरुन मागणे मागितले आहे.

श्रीदत्तलीलामृताब्धिसार – दत्तमहात्म्यावर आधारित असा हा कथारुप अतिशय सुलभ छोटा ग्रंथ.

दत्तचंपू – दत्तपुराणातील प्रमुख शिकवणुकीवर आधारित असा संस्कृत ग्रंथ.

शिक्षात्रयम् – वर्णाश्रिमधर्माचे महत्व सांगणारा हा ग्रंथ संस्कृत भाषेत असून त्याचे कुमारशिक्षा, युवाशिक्षा व वृद्धशिक्षा असे तीन भाग आहेत. वृद्धशिक्षा हा महत्वाचा भाग असून यात प्रस्थानत्रयीतील सर्व विषय अत्यंत सूक्ष्मरुपाने हाताळलेले आहेत.

स्त्री शिक्षा – स्त्रीधर्मविषयक संवादरुप मराटी ग्रंथ.

योग रहस्य व बोध रहस्य – योग व ज्ञान या दोन मोक्षमार्गाचे विवेचन करणारे हे दोन प्रकरण ग्रंथ संस्कृतामध्ये असून त्यांचा अंतर्भाव द्विसाहस्त्रीमध्ये केला आहे.

लघुवासुदेवमननसार – स्वामीमहाराजांचे तत्वज्ञान अतिशय सोप्या भाषेत व थोडक्यांत सांगणारा मराठी संवादरुप ग्रंथ. ब्रह्मांचे स्वरुप, विश्वाची उत्पत्ती, माया, अविद्या, जीव यांचे स्वरुप, आत्म्याचे नित्यत्व अशा अनेक महत्वाच्या विषयांची चर्चा या ग्रंथात केली आहे.

माघमहात्म्य – धार्मिक प्रथा व रुढीचे महत्व सांगणारा पद्यरुप ग्रंथ.

स्तोत्रादि संग्रह – स्वामी महाराजांनी निरनिराळया प्रसंगी केलेल्या मराटी, संस्कृत स्तोत्रांचा, प्रार्थनांचा संग्रह, स्तोत्रपटणाने ऐहिक व पारलौकिक सुखांची प्राप्ती होते असे शास्त्र सांगते. ते भक्तीचे एक प्रभावी साधन आहे. ब-याचशा स्तोत्रात महाराजांनी महत्वाच्या मंत्रांचा समावेश केला आहे त्यामुळे पाटकाला मंत्रजपाचा फायदाही आपोआप मिळतो.

पंचपाक्षिक – वेदांग ज्योतिषावर आधारित, ज्योतिषशास्त्रावर लिहिलेला अपूर्व ग्रंथ. ज्योतिष शास्त्राच्या अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त ग्रंथ. त्या शिवाय दत्तप्रभुंचे वेदनिवेदनिनामक सटीक व सभाषांतरित स्तोत्र, श्रीकृष्णलहरी सटीक, सविवरण व सभाषांतर, कीर्तनोपयोगी कांही आख्याने, स्तोत्रे, पदे व मोटया महाराजांचे संक्षिप्त चरित्र हेही विषय त्यात आले आहेत.

# प पू श्री गुळवणी महाराज

श्री वामनरावजी गुळवणीमहाराजांचा जन्म  कोल्हापुर जिल्ह्यातल्या कुडूत्री या गांवी झाला. माता उमाबाईंना साक्षात् दत्तप्रभुंनी दर्शन देऊन चांदीच्या पादुका दिल्या त्या आज श्रीवासुदेवनिवासांत आहेत. वडीलांची प्रवृत्ती तपस्वी, विरक्त व अनासक्त होती. महाराजांच्यावर बालपणापासूनच उत्तम धार्मिक संस्कार झाले. शालेय जीवनात सुरवातीपासून महाराजांना कलेची आवड होती. त्यांनी चित्रकलेच्या सर्व परिक्षा दिल्या. १९०८ साली प पू श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांची प्रथम भेट झाली. पुढे मोटया महाराजांचा पवनीला मुक्काम असताना श्रीमहाराज त्यांच्या दर्शनाला गेले. स्वामीमहाराजांनी महाराजांना आसने, प्राणायाम, वगैरे शिकवले, अजपाजप सांगितला. पुढे श्रीमहाराजांनी श्रीदत्तमालामंत्राचे अनुष्टानही केले.  तिसरी व शेवटची भेट गुरुडेश्वरला झाली. त्यावेळी स्वामीमहाराजांनी महाराजांना बरेच दिवस टेवून घेऊन पुढचे मार्गदर्शन केले. बार्शी व पुण्याला चित्रकलेचे शिक्षक म्हणून नोकरी करत असताना महाराजांच्या अंतरंगाची कुणालाही फारशी ओळख झालेली नव्हती. नोकरी व्यतिरिक्त ते सद्ग्रंथाचे वाचन, योगाभ्यास, व शास्त्राज्ञेप्रमाणे इतर नित्यकर्म नियमाने, श्रद्धेने करीत. त्यांची राहाणी अत्यंत साधी, एकांत प्रिय होती. योगाभ्यासात विशेष रुची असल्याने पुढील मार्गदर्शनासाटी त्यांच्या गुरुबंधूंकडे श्री गोविंद पंडितांकडे होशंगाबादला गेले असता त्यांची प पू श्रीलोकनाथतीर्थांची भेट झाली व त्यांनी महाराजांची योग्यता, अभ्यास, अधिकार पाहून त्यांना केवळ शक्तीपात दीक्षाच दिली नाही तर शक्तीपात दीक्षा देण्याचा अधिकारही दिला. पुढे श्रीलोकनाथतीर्थ समाधिस्थ होईपर्यंत महाराजांना त्यांचा उदंड सहवास लाभला, सेवा घडली. आणि विशेष म्हणजे हे सर्व श्रीमहाराजांनी नोकरी

सांभाळून केले. पुढे नोकरी सोडल्यावर त्यांनी पूर्णपणे सेवाकार्याला व लोकोद्धाराला वाहून घेतले. प पू श्रीदत्तमहाराजांच्या सहाय्याने त्यांनी मोटया महाराजांचे समग्र वाङ्मय १४ खंडात १९५४ साली प्रसिद्ध केले. अनेक तीर्थयात्रा केल्या. महाराज नारायण पेटेतल्या गोवईकरांच्या चाळीतील दोन खोल्यात राहात होते. दिवसेंदिवस लोकांचा त्यांच्याकडे ओघ वाढू लागला. आल्यागेल्यांची सोय होणे आवश्यक होते तसेच श्रीगुरुपौर्णिमा व इतर उत्सव साजरे करायलाही जागेची नितांत गरज भासू लागली. त्यातूनच आणि मोटया महाराजांचे पुण्यस्मरण म्हणून १९६५ श्री वासुदेव आश्रम निर्माण झाला. त्यांच्या भक्तांनी महाराजांचे भैमरथी शांती, सहस्त्रचंद्र दर्शन शांती, रौद्रि शांती असे समारोह साजरे केले. महाराजांच्याकडून असंख्य देवस्थाने, वेदपाटशाळांना मुक्त हस्त मदत झाली. निरनिराळया यज्ञयागांच्या निमित्ताने उदंड दानधर्म झाला. श्रीवासुदेव निवासात महाराजांचे शेवट पर्यंत वास्तव्य झाले. १५ जानेवारी १९७४ रोजी ते चैतन्यरुप झाले. स्थूल देहाचा त्याग केला तरीसुद्धा अजूनही अधिकारी साधकांना ते मार्गदर्शन करताहेत, भक्तांना दर्शन देताहेत. अव्यक्तरुपाने त्यांचा श्रीवासुदेव निवासात वास आहे याची प्रचिती येते. आपले उत्तराधिकारी म्हणून त्यांनी सर्वानुमते प पू श्रीदत्तमहारांची नियुक्ती केली व त्यांनी हे लोकोद्धाराचे कार्य पुढे शेवटपर्यंत चालू टेवले.

श्रीमहाराजांची चरित्रे पुढीलप्रमाणे उपलब्ध आहेत :

१. श्रीरामकवि विरचित श्रीवामनत्रिपदी हे पद्य चरित्र.

२. अगदी सुरवातीला सोलापूरच्या श्री बापूसाहेब कुबडे यांनी लिहिलेले चरित्र आणि

३. श्री अ सि पोटभरेलिखित व श्रीवासुदेवनिवास प्रकाशित जीवनगंगा हे ४ खंडातील विस्तृत चरित्र तसेच स्मर्तुगामींच्या स्मृती हे भक्तांनी लिहिलेल्या आटवणींचे पुस्तक.

४. शिवाय श्री महाराजांनी साधकांच्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरांचे सद्गुरुसाधक संवाद हे कोणाही साधकाला अत्यंत मार्गदर्शक टरेल असे महत्वाचे पुस्तक आहे.

# प पू श्री धुंडिराज महाराज

कविश्वर घराणे मूळचे नगर जिल्ह्यातील मांडवगडचे. हे गांव नगरच्या आग्नेय दिशेला सुमारे ४० किलोमीटरवर आहे. मांडवऋषिंची ही तपोभूमि. त्यांचे त्यावेळचे आडनांव सप्तर्षि. हे उपमन्यू गोत्राचे शुक्लयजुर्वेदि मांध्यादिन शाखेचे अत्यंत आचारसंपन्न ब्राम्हण. पुढे याच्या कांही शाखा बाहेर पडल्या व महाराष्ट्राच्या निरनिराळया भागात जाऊन स्थिरावल्या. पुढे त्यांची आडनांवेही बदलत गेली. नरसोबावाडीत आलेल्या शाखेला कविश्वर हे नांव त्यांच्या अलौकिक काव्यशक्तीमुळे पडले. कविश्वरांची कुलस्वामिनी जरी रेणुकामाता असली तरी पूर्वजांनी मोरगांव येथे असणा-याा महान गणेशभक्त योगिंद्र महाराजांकडून गणेशमंत्रोपासना घेऊन तेथेच उपासना सुरु केली. त्याच बरोबर चतुर्थीव्रतालाही सुरवात केली. जवळ जवळ वर्षभर दुर्वाच्या रसावरच राहून सेवा केल्यावर त्यांच्या स्वप्नात एका तेजःपुंज ब्राम्हणाने येऊन श्रीगणेशमूर्ती दिली व सांगितले, तुझे काम झाले. तुझ्या कुळात सात पिढया विद्वान पुराणवाङमय पारंगत लोकमान्य पुरुष जन्माला येतील. माझ्या उपासनेमुळे तुमच्या कुळाचे पूर्ण कल्याण होईल.

अशा या गणेशकृपासंपन्न घराण्यात श्रीवक्रतुंडमहाराजांचा जन्म आश्विन व.४ शके १७६१ रोजी झाला. लहानपणापासूनच भगवत् भक्तीचे संस्कार त्यांच्यावर झाले. उपनयन झाल्यावर वेदाध्ययनाला सुरवात झाली. पुढे योग्य वेळी त्यांचा विवाह झाला. याच काळात मोटे महाराज वाडींत वास्तव्यासाटी येत असत. एकदा दत्तप्रभुंनी

मोठ्या महाराजांना लिंगार्चन करण्याची आज्ञा केली. त्यांनी प्रथम तसे करण्यास नकार दिला कारण त्यांना लिंगार्चनाचे विधान माहित नव्हते. तेव्हां दत्तप्रभुंनी महाराजांना परत दृष्टांत देऊन सांगितले, वक्रतुंडबुवांकडे विधान मिळेल त्यांच्याकडे जा. यावरुन वक्रतुंडमहाराजांचा अधिकार समजून येतो. त्यांनी वाडी येथे मोठा यज्ञ केला तो दत्तप्रभुंच्या कृपेने निर्विघ्नपणे पार पडला.

वक्रतुंडमहाराज देऊळगांवराजाला व्यंकटेशाची सेवा करण्यात जात असत. तीच परंपरा श्रींनी चालू टेवली. त्यांनी देवालयग्राम महात्म्य हा देऊळगांवराजाचे महत्व सांगणारा ग्रंथ लिहिला. श्रीक्षेत्र राजूर येथील गणपतिने वक्रतुंडमहाराजांच्या हातून नैवेद्य ग्रहण केला होता. त्यांच्या सिद्ध वाणीने अनेक दुःखी, पिडीत लोकांना संकटमुक्त केले. त्यांची संतती जगत नव्हती. शेवटी विरक्ती निर्माण होऊन वाडीत राहात असलेल्या प पू श्रीगोविंद स्वामी या अधिकारी महात्म्यांच्याकडे संन्यास घेण्याकरता आले. स्वामीमहाराजांनी संन्यास द्यायच्या ऐवजी आपल्या पूजेतील दत्तमूर्ती त्यांना देऊन तिचा पुत्रवत् सांभाळ करण्यास सांगितले.

हेच प्रसिद्ध दत्तुबाळ होय. वक्रतुंडमहाराजही दत्तुबाळाचा पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळ करीत. कोणालाही मंत्रोपदेश करताना महाराज दत्तुबाळाला समोर टेवून उपदेश देत. दत्तुबाळ खरोखरच त्यांच्या सतत बरोबर असे. आता दत्तुबाळ श्रींच्या रोजच्या पूजेतल्या देवात आहे. पुढे त्याच्या प्रसादानेच जेष्ट शु. २ शके १८०८ रोजी धुंडिराज महाराजांचा जन्म झाला.

त्यांचे बालपण व शिक्षण वाडीत झाले. प्राथमिक परंपरागत वेदाध्ययन वाडींत झाल्यावर पुढील शिक्षणासाटी ते सांगली व इंदोर येथे गेले. वयाच्या १८व्या वर्षी त्यांचा विवाह झाला. सौ सरस्वतीबाई वाडींत देवाला रोज नियमित प्रदक्षिणा घालीत. त्या शिवाय परंपरागत चालत आलेली उपासना त्यांची शेवटपर्यंत चालू होती. धुंडिराज महाराजांकडे येणा-या सर्व भक्त मंडळींचे अतिशय प्रेमाने त्या सर्व करीत. मोटे महाराज वाडीला आले म्हणजे

धुंडिराज महाराजांना त्यांचा जवळून सहवास मिळे. मोटया महाराजांचे कविश्वरांच्या पूर्व पुण्याईचे त्यांच्या घराण्यावर प्रेम होते. त्यामुळेच तर श्रींचा वाडीतल्या घरात जन्म झाल्यावर मोटे महाराज स्वतः श्रींना पहायला घरात आले होते. श्रींना ते अत्यंत संतोषाने म्हणाले, ''काय वक्रतुंडमहाराज आलात ना१ आपण या पांढ-या वेषात व आम्ही भगव्या वेषात एवढाच काय तो तुमच्या आमच्यात फरक.''

मोटया महाराजांच्या आज्ञेने धुंडिराज महाराजांनी वाडीत वेदपाटशाळा सुरु केली. थोरल्या आईसाहेब धुंडिराजमहाराजांबरोबर विदर्भ, मराटवाडा, वगैरे भागात नेहमी बरोबर असत. त्या वेळी मोटया महाराजांचे प पू गुळवणी महाराजांनी प्रकाशित केलेले ग्रंथ त्या बरोबर नेत व लोकांना त्यांचे महत्व पटवून सांगत. स्त्रियांना त्यांचे मार्गदर्शन असे. दोघांच्याही तपश्चर्येचा लोकांवर प्रभाव पडू लागला. अनेक लोक त्यांच्याकडून अनुग्रह घेऊ लागले. त्यांनी दिलेल्या मंत्रोपासनेमुळे अनेक लोक दुःखमुक्त होऊ लागले. कोण व्याधिमुक्त झाला तर कोणाला संततिची प्राप्ति झाली. कोणाला नोकरी मिळाली तरी कोणाच्या मुलांची लग्ने झाली. धुंडिराजमहाराजांच्या निरनिराळ्या शांति सोहळयांच्या निमित्ताने अनेक यज्ञयाग त्यांच्या भक्तांनी मोटया उत्साहाने केले. पुढे थोरल्या आईसाहेबांनी सुलतानपुर येथे आपला देह टेवला तर धुंडिराजमहाराज देऊळगांवराजा येथे समाधिस्थ झाले १९७८. त्यांच्या पुण्याईने महाराजांच्या आधी जायची इच्छा पूर्ण झाली. अयक्तरुपाने आजही त्यांचे कार्य चालू असल्याची अनेक उदाहरणे प्रत्यक्ष पहायला, ऐकायला मिळत आहेत. प पू सौ ताईमहाराजांनी मोटया आईसाहेबांची सुलतानपूर येथे मोटी समाधि बांधली आहे. देऊळगांवराजात धुंडिराज महाराजांचा पुण्यतिथी उत्सव आजही प्रचंड प्रमाणावर साजरा होतो. हजारोंनी अन्नदान होते. थोरल्या आईसाहेबांची पुण्यतिथी सुलतानपूरला दर वर्षी साजरी होते.

प पू श्री काजळकरमहाराज श्री धुंडिराजमहाराजांचे शिष्य. तेही मोटे अधिकारसंपन्न होते. मराटवाड्यात त्यांचा मोटा शिष्य परिवार आहे. त्यांनी रामनामाचा १३ कोटी जप पूर्ण करुन श्रीरामांचे दर्शन प्राप्त करुन घेतले होते. त्या शिवाय श्रीगुरुचरित्र व देवीसप्तशतीचे असंख्य पाट त्यांच्याकडून झाले. मेलेल्या व्यक्तीला जिवंत करण्याचे सामर्थ्य त्यांच्याकडे होते. आपली सर्व शक्ती आणि अध्यात्मिक अधिकार त्यांनी देह टेवण्यापूर्वी १९७४ आपल्या कन्येला म्हणजेच प पू सौ ताईमहाराजांना दिली. आपल्या पिताजींप्रमाणेच प पू सौ ताईमहाराज गेली २७ वर्ष हजारो जीवांचे दुःख दूर करताहेत. त्यांना स्वतःलाही वडिलांप्रमाणेच प पू श्री धुंडिराजमहाराजांचा अनुग्रह व सहवास लाभला. वयाच्या १२व्या वर्षापासून त्या ईश्वरभक्तीकडे वळल्या. साधूसंतांनी केलेले मुख्य मुख्य सर्व ग्रंथांचे त्यांनी नुसते अध्ययन केले असे नाही तर त्याची अनुभूति घेतली. आणि त्याच्या मार्गदर्शनाप्रमाणे परमार्थाची वाटचाल करणा-याला त्या ती अनुभूति देऊ शकतात. जीवनातले सर्व बरेवाईट अनुभव घेऊन सामान्य मर्त्य, दिशाहीन, ध्येयशून्य जीवनातली निरर्थकता, भ्रामकता त्यांच्या लहान वयातच लक्षात आली आणि जीवनात आपण काय मिळवायचे हे त्यांनी निश्चित केले. अनेक दुःखातून गेल्यामुळे तीव्र वैराग्य त्यांच्या टिकाणी निर्माण झाले आणि एक आपले सद्‌गुरु सोडले तर जीवनात आपल्याला कोणाचाच आधार नाही हे पक्के समजले. आणि श्रींनी त्यांचे सर्व जीवन व्यापून कृतार्थ करुन सोडले. श्री त्यांचे वर्णन साक्षात् भगवती असेच करीत. जालन्यातील न्हावा रोडवर श्रीदत्ताश्रमाची स्थापना वैश्विक सुखशांतिसाटी श्रींच्या हस्ते २० एप्रिल १९९४ म्हणजेच श्रीरामनवमीच्या सुमुहूर्तावर झाली. त्या वेळी श्रींनी जाहीररित्या सांगितले की ताईमहाराजांच्या तपःप्रभावाने हे स्थान निर्माण झाले असून इथे सर्व देवतांचा निवास आहे. श्रींनी क्वचितच कधी इतके स्पष्टपणे कोणाबद्‌दल सांगितले असेल. जर श्रींनी त्यांचा परिचय करुन दिला नसता तर आम्हाला तो कधी झाला असता की नाही कोणास टाऊक कारण त्या नेहमी सर्व सामान्यांच्या सामान्यांप्रमाणेच राहतात. आपल्या ख-या ईश्वरी

शक्ती स्वरुपाची कोणाला जाणीव होऊ देत नाहीत. भक्तीभावाने श्रद्धा ठेवून येणा-याला इथे श्रींच्या शब्दांचा अनुभव येतो.

प पू सौ ताईमहाराजांच्या केवळ दर्शनाने व कृपादृष्टीने आलेल्या जीवाचे मन परिवर्तन व्हायला सुरवात होते. आंतरिक शुद्धी होऊ लागते. आणि हळू हळू त्याचे दोष नाहीसे होऊ लागतात. त्याच प्रमाणे ईश्वराला शरण जाण्याची, समर्पणाची भावना उत्पन्न होऊन त्याचा अहंकार हळू हळू कमी कमी होऊन आपण कोण आहोत, कसे आहोत याची त्याला जाणीव होते आणि प पू सौ ताईमहाराजांच्या दर्शनाची ओढ लागते. आलेल्या जीवाचे कल्याण व्हावे एवढीच त्यांना तळमळ असते. दुःख एक ईश्वराजवळ जाण्याचे निमित्त असते आणि त्या निमित्ताने प पू सौ ताईमहाराज त्या जीवाला भक्तीमार्गाला लावतात. त्याच्याकडून ईश्वराची भक्ती, सेवा करुन घेतात आणि त्याचे दुःख दूर करतात. आणि स्वतः बाजूला होतात. महाराजांनी तुमच्या भक्तीचे तुम्हाला फळ दिले त्यांना विसरु नका असे सांगून स्वतः अलगद बाजूला होतात. अकर्तृत्व, अमानित्व, पूर्ण शक्ती, वगैरे ईश्वरी शक्तीची सर्व लक्षणे त्यांच्या ठिकाणी साकार झालेली आपल्याला पहायला मिळतात. त्यांचे जीवांना संकटमुक्त करायचे उपायही अगदी साधे असतात – चालत घरापासून मंदिरात येऊन दर्शन घ्या, दिगंबराचा जप करा, मंदिरात सेवा करा, बाहेरगांवच्या लोकांना जालन्याची वारी करायला सांगतात, वगैरे हे कोणालाही बिनखर्चात करता येतात पण फळ मात्र मोठे मिळते. पूजा नाही, अभिषेक नाही, यज्ञ नाही, याग नाही, मोठमोठी अनुष्ठाने नाहीत त्यामुळे अगदी गरीबातल्या गरीब माणसालाही प पू सौ ताई महाराज फार मोठा आधार आहेत,

त्यांना संसार आहे पण त्या संसारात नाहीत कारण सगळ्या विश्वाचा संसार त्यांना करायचा आहे. त्यांचे यजमान एका खाजगी कंपनीत नोकरीला होते, चारही मुले कमावती आहेत. त्यांची लग्ने झाली असून प पू सौ ताईमहाराजांना नातवंडेही आहेत. पण सामान्य जीवाप्रमाणे त्या या सगळयात कुठे रमलेल्या पहायला मिळत

नाहीत. या कलीयुगात संसारात राहूनही परमपदाची प्राप्ती करुन घेता येते हे त्यांनी आपल्या उदाहरणावरुन जगाला दाखवून दिले आहे. नांदेडला असताना घरातले सगळे उठायच्या आंत पहाटे लवकर उठून त्या गंगेवर जाऊन आपले स्नान, जप वगैरे आटोपून त्या परत येत. हा नियम त्यांचा हिवाळा असो पावसाळा असे कधी चुकला नाही. तिथल्या बालाजी मंदिरात प पू सौ ताईमहाराजांच्या ख-या स्वरुपाची जाणीव त्यांच्या भजनी मंडळातल्या बायकांना प्रथम झाली. यजमान कामावर गेले, मुले शाळेत गेली की घरचे सर्व काम आटोपून त्या बालाजी मंदिरात येऊन उपासनेला बसत. एकदा बालाजीच्या मूर्तितून निघालेली ज्योत ताईच्या शरीरात गेलेली पाहिल्यावर मात्र त्यांच्या भजनीमंडळातल्या बायकांना ताई कोण आहेत याची प्रथम जाणीव झाली. मग हळू हळू धीर करुन त्या प पू सौ ताईमहाराजांना आपापली सांसारिक दुःखे सांगून दुःखमुक्त होण्याचा उपाय विचारु लागल्या.

श्रीदत्ताश्रमात सकाळी पूजा व संध्याकाळी नित्योपासना होत असते. दर गुरुवारी महाआरती असते. त्या शिवाय दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा या महामंत्राचा तिथे सतत जप चालू असतो. विश्वकल्याणासाटी, शांतीसाटी निरनिराळे याग होतात, त्यानिमित्ताने फार मोटया प्रमाणावर अन्नदान होते. एरव्हीदेखिल रोज आलेल्या प्रत्येक भक्ताला भोजन प्रसाद मिळतो. श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा, श्रीदत्तजयंति हे तिथले मुख्य उत्सव असून त्याशिवाय श्रीशंकराचार्य जयंति, गुरुद्वादशी व सांप्रदायिक संतांचे जयंति व पुण्यतिथी उत्सव साजरे होतात. या निमित्ताने प पू श्री अशोकमहाराज जालन्याला येऊन भक्तांना मार्गदर्शन करतात. प पू सौ ताईमहाराज स्वतः प्रवचन करीत नाहीत परंतु कोणत्याही अध्यात्मिक, पारमार्थिक जिज्ञासेचे सहज सोप्या सामान्यांना समजेल अशा भाषेत समाधान करतात त्यामुळे समाजातील सर्व वर्गातले लोक, उच्च शिक्षित, अशिक्षित वगैरे इथे त्यांच्या चरणी लीन झालेले आपल्याला पहायला मिळतात. त्या स्वतः कोणाला मंत्रोपदेश करीत नाहीत. दिवसभर सतत

भक्तांची दर्शनाला, त्यांच्याकडून मार्गदर्शन घ्यायला रीघ लागलेली असते. श्रीक्षेत्रनरसोबावाडीप्रमाणे जालन्यातही श्रीदत्त पादुकांची स्थापना झाली आहे.

श्रीदत्ताश्रमाची व्यवस्था ट्रस्ट पहातो. अधिक माहिती करता जालना परिचय पुस्तिका पहावी.

# प पू श्रीदत्तमहाराज

श्रीचा जन्म नरसोबा वाडीत २ मार्च १९१० रोजी माघ वद्य ६ झाला. महाराजांचे वडिल प पू श्रीधुंडिराज महाराज व आजोबा श्रीवक्रतुंडमहाराज प्राचीन विद्या उपासना आणि भक्तीसंपन्न महाराज संज्ञेचे अधिकारी प्रवचनकार होते. श्रीवासुदेवानंद सरस्वतींचे एकमेव दंडी स्वामी शिष्य श्रीदीक्षितस्वामी यांनी औरवाड येथे स्थापन केलेल्या श्रीवासुदेवानंद सरस्वती पीठात महाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी पहिला भागवत सप्ताह केला. पुढे चाळीस वर्ष तो चालू होता. सुरवातीचे त्यांचे शिक्षण वाडीतल्याच वेदपाठशाळेत झाले नंतरचे सांगलीत झाले. धारवाडच्या शंकराचार्य वेदपाठशाळेत नागेशशास्त्री उप्पेनबेटगिरींजवळ त्यांचे न्याय व वेदांत शास्त्राचे शिक्षण झाले. पंडित सुब्बाशास्त्रींजवळ त्यांनी मीमांसशास्त्राचा अभ्यास केला. १९३७ च्या दरम्यान त्यांनी न्यायाचा विशेष अभ्यास केला. त्याच वर्षी ते पुण्याच्या शंकर पीठात न्याय व वेदांतशास्त्राचे अध्यापक म्हणून रुजू झाले. त्यांच्या निंबार्काचार्यांच्या भाष्याचे नुसते मराठी भाषांतर नव्हे तर त्यांच्या प्रतिभेची अभ्यासू प्रवृत्तीचे निदर्शन असणारा वेदांत पारिजात सौरभ आदर्श ग्रंथ १९६५ मध्ये पुण्याच्या टिळक विद्यापीठाने प्रकाशित केला. तिरुपति, बंगळूर, विजयवाडा वगैरे अनेक टिकाणच्या विद्वत सभेत त्यांचे अनेक वेळा सत्कार होऊन निरनिराळे सन्मान मिळाले. भारताच्या राष्टपतिंकडून तीन वेळा त्यांचा गौरव केला गेला. डॉ राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते विद्यावाचस्पती, श्री गिरी यांच्या हस्ते राष्टीय संस्कृत पंडित आणि डॉ शंकर दयाळ शर्मा यांच्या हस्ते राजपत्र देऊन त्यांचा गौरव झाला होता. चारही पीठांच्या शंकराचार्यांकडून त्यांचा सन्मान झाला होता. असूनही त्यांच्या सौजन्यशील सात्विक स्वभावामुळे रीतसर शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांपासून सांप्रदायिक भक्तांपर्यत सर्वांना ते आपलेच वाटत असत. १९५२ ते १९७० त्यांनी पुण्याच्या बालमुकुंद संस्कृत विद्यालयात अध्यापन केले. त्यांच्याकडून न्याय व वेदांत

शिकायची संधि मिळणे अपूर्व पर्वणी असे. आणि देशाच्या सर्व भागातून त्यांच्याकडे विद्यार्थी येत असत. १५ जानेवारी १९७४ रोजी प पू गुळवणी महाराजांच्या निर्याणानंतर श्रीवासुदेवनिवास व त्यांच्या अवतारकार्याची सूत्रे उत्तराधिकारी या नात्याने श्रीदत्तमहाराजांकडे आली. जीवाच्या अधिकारप्रमाणे व इच्छेप्रमाणे त्यांनी शेवटपर्यंत मंत्रदीक्षा व शक्तिपात दीक्षा प्रदान करुन श्रीगुरुमहाराजांची परंपरा चालू टेवली.

प पू श्रीगुळवणीमहाराजांच्या संकल्पाप्रमाणे श्रीवासुदेवानंद सरस्वतीच्या समग्र ग्रंथांचे संशोधन करुन ते प्रकाशित करण्याचे श्रेय श्रीमहाराजांकडे जाते. हे सुमारे ५००० पृष्टांचे बारा खंड आहेत. तसेच सर्वदर्शन संग्रहाचे मराटी भाषांतरही त्यांनी केले आहे. निरनिराळ्या प्रसंगाने त्यांनी स्वतंत्र लेखनही केले आहे. त्यांचे लेखन त्यांच्या प्रकांड पांडित्याची साक्ष देणारे आहे. विद्या विनयेन शोभते असे वर्णन त्यांना लागू पडत होते. विद्वत्तेच्या क्षेत्रात त्यांचा अधिकार एवढा मोटा होता की गर्व, अहंकारदेखिल साजरा वाटला असता पण भक्तीच्या वातावरणात पोसलेला त्यांचा पिंड कधीही अहंकार, परनिंदा, क्रोध, द्वेष याच्या आसपासही गेला नाही. त्यांच्या विद्वत्तेचे तेज दिपवून टाकणारे न वाटता नीरांजनासारखे शांत वाटत असे ते त्यांच्या सात्त्विकतेमुळे.

अमरापूरच्या श्रीदत्तअमरेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार त्यांच्या आशिर्वादाने झाला. दत्त सांप्रदाय वाढविण्यात त्यांचे योगदान फार मोटे आहे. आपल्या अजात शत्रु स्वभावाने त्यांनी असंख्य शिष्यांना घडवले आहे. त्यांचे जीवनच एखाद्या तपस्व्याप्रमाणे होते, विमल चारित्र्य, नैष्टिक आचरण, कमालीची ऋजुता ही त्यांची वैशिष्टे होती. निगर्वी सात्विक वृत्ती, तेजस्वी पांडित्य यामुळे ते ज्ञानयोगीच वाटत. प्रवचने, ज्ञानसत्रे यांच्या निमित्ताने त्यांचा अवघ्या महाराष्टातच नव्हे तर महाराष्टाबाहेरही संचार असे. परंतु त्यांनी कधी स्वतःचा बुवा होऊन दिला नाही किंवा स्तोम माजवले नाही. स्निग्ध तेजाने उजळणा-या नंदादीपाप्रमाणे ते तेवत राहिले.

सौ. आईसाहेबांनी श्रींना जवळ जवळ ७० वर्ष उत्तम साथ दिली. त्यांचे माहेर बार्शीच्या पाटकांचे. अनेक जन्मांच्या पुण्याईने या लक्ष्मीला साक्षात् नारायणाची प्राप्ती झाली. कविश्वरांच्या संतकुळात पाऊल टाकल्यापासून शेवटपर्यंत त्यांना सत्संग घडला. श्रीगुळवणीमहाराजांना श्रींच्या बद्दल इतकी आत्मीयता होती की महाराज रोज सकाळी फिरायला बाहेर पडले की श्रींच्या घरी जाऊन आईसाहेबांना भेटून चार शब्द बोलून येत, त्यांना काय हवं नको ते विचारत. श्रींची थोरवी आईसाहेबांना पटवून देत. त्या संसार कार्यात अतिशय दक्ष होत्या. सर्व कौटुंबिक जबाबदा-या त्यांनी अतिशय दक्ष होत्या. सर्व कौटुंबिक जबाबदा-या त्यांनी अतिशय यशस्वीरीत्या पार पाडल्या. थोरल्या आईसाहेबांप्रमाणेच त्यांनी श्रींच्याकडे येणा-या भक्तांवर पुत्रवत् प्रेम केले व त्यांचे आईसाहेब हे नांव सार्थ केले.

फार मोटा व व्यापक कार्यभार सांभाळायचा असल्याने प पू श्रींना अगणित भक्तांशी वैयक्तिक भेटी घेऊन उपदेश करणे शक्य नव्हते तेव्हां त्यांना आपले समाजाला ज्ञानदान देण्याचे अवतार कार्य करण्याकरता प्रवचनांच्या प्रभावी माध्यमाचा उपयोग झाला. तीच ज्ञानरुपी गंगा दूरदूरवर पसरलेल्या भक्तगणांपर्यंत पोहोचवण्यासाटी भगवती प्रकाशनातर्फे जालन्याच्या श्रीदत्ताश्रमाने त्यांची प्रवचनांची सर्व पुस्तके आजवर प्रकाशित केली असून ती श्रीदत्ताश्रम, न्हावा रोड, जालना येथे उपलब्ध आहेत.

सर्व सामान्यपणे बहुतेक सर्वांना त्यांनी आजपर्यंत जे मार्गदर्शन केले त्याचे सार पुढिलप्रमाणे आहे :-

१. जास्तीत जास्त नामस्मरण करा.

२. ईश्वराची तळमळीने प्रार्थना करा.

३. नियमित साधना, उपासना करा.

४. संतांची चरित्रे आणि ग्रंथ वाचा

साधना कशी करु, किती करु, केव्हां करु असे टराविक प्रश्न हजारो लोक त्यांना विचारत त्यांचे उत्तर एकच असे – जसे जमेल, सवड असेल तसे बसा. कडेचे पोहोणारे साधक याचा अर्थ असा घेत की आपल्याला इतर व्यापातून सवड मिळाली तर साधना करायची. तळमळीचा साधक त्याचा अर्थ असा घेत की जास्तीत जास्त सवड काढून साधना करा.

अमानित्वाचा मूर्तिमंत पुतळा असलेल्या श्रींचे चरित्र आधी समजून येणेच कठिण मग त्यांच्याबद्दल अधिकारवाणीने लिहिणे बाजूलाच. तरीही भक्तांना त्यांचे चरित्र जाणून घ्यावेसे वाटते, अभ्यासावेसे वाटते, लिहावेसे वाटते. या भावनेतूनच आजपर्यंत श्रींची पुढिल ३ चरित्रे प्रकाशित झाली आहेत :

१.श्रीदत्तवाक्सुधा : ले. अ सि पोटभरे – प्रकाशक : श्रीवासुदेवनिवास,पुणे
२. प्रयाग : ले. नीलाताई जोशी, प्रकाशक : श्रीवासुदेवनिवास,पुणे

# प.पू. श्रीरंगावधूत स्वामी महाराज

| | | |
|---|---|---|
| पूर्वाश्रीमीचे नांव | : | पांडुरंग |
| माता | : | रुक्मिणी |
| पिता | : | विट्टल |
| जन्म | : | २१.११.१८९९ |
| स्थळ | : | गोध्रा |
| समाधि | : | १९.११.१९६८, हरिद्वार |
| कार्य | : | समाज, राष्टोद्धार , गुजरातेत दत्तभक्तीचा प्रसार |
| कार्यक्षेत्र | : | गुजरात |
| वाङ.मय निर्मिती | : | १. श्रीगुरुलीलामृत २. संगीत गीता ३. पत्र गीता ४. प्रश्नोत्तर गीता ५. उपनिषदोंनी वातो ६. उषः प्रार्थना ७. उभो अवधूत ८. बैटो अवधून ९. ग्राम अवधूत १०. अवधूती मौज ११. श्रीरंगहृदयम १२. श्रीवासुदेवसप्तशती १३. रंगतरंग १४ाजने १५. अमर आदेश |

## १६.पूर्वाश्रमात टॉलस्टॉयच्या कथांचे भाषांतर

प.पू. श्रीरंगावधूत स्वामी महाराजांना प्रेमाने बापजी असे सगळे म्हणत. बापजींचे पिताजी ते अगदी लहान ५ वर्षांचे असतानाच गेले. आईनेच त्यांचा व त्यांच्या भावाचा संभाळ केला. मुंज झाल्यावर वाडीला ते आले असता मोटया महाराजांचा कृपाप्रसाद झाला. रामकृष्ण परमहंसांची त्यांच्या जीवनावर फार मोठी छाप पडली. गीतेतल्या १६व्या अध्यायात सांगितलेली दैवी लक्षणे विद्यार्थी दशेतच त्यांच्यात पहायला मिळाली. त्यांचे शिक्षण एम.ए. पर्यंत झाले. त्यांचा इंग्रजीचा गाढा अभ्यास होता. कांही काळ त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. पुढे कांही वर्ष गांधीजींच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी राष्ट्सेवेत भाग घेतला. पण बहुतेक नेत्यांच्या विचार, वाणी व वर्तनामध्ये एकवाक्यता न दिसल्यामुळे आणि राजकारणात दंभाचे साम्राज्य वाढू लागल्यावर त्यांनी राजकारणातून निवृत्ती घेतली आणि अध्यात्ममार्गाकिडे वळले. श्रीदत्तपुराणची १०८ पारायणे केली. १०८ दिवसात नर्मदा परिक्रमा पूर्ण केली. नारेश्वर ही त्यांची तपोभूमि आहे. उत्तरेत तप झाल्यावर त्यांना मोटया महाराजांनी दक्षिणेत जायची आज्ञा केली. पण दक्षिणेत म्हणजे कुटे असे विचारले असता त्यांना महाराजांनी सांगितले कि जिथे परस्पर विरोधी स्वभावाचे प्राणी एकत्र प्रेमाने नांदताना दिसतील तिथे तूं स्थिर हो. गुर्वाज्ञेप्रमाणे ते फिरत फिरत नर्मदेच्या किना-या वरील नारेश्वर येथे आले असता तिथे त्यांना मुंगसावर सापाने ऊन लागू नये म्हणून धरलेली दिसली. महाराजांच्या आज्ञेची प्रचिती आली आणि तेच आपले स्थान अशी त्यांची खात्री झाली. त्यावेळी नारेश्वरच्या प्राचीन मंदिराभोवती जंगल वाढले होते. जवळपास कोणतीच वस्ती नव्हती तरीही महाराजांच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी तिथेच राहायचा निश्चय केला. कस्तुरी कितीही लपवली तरी तिचा सुगंध लपून थोडाच राहाणार ? बापजींनी कधी कोणाला बोलावले नाही पण आपल्या शिष्याकडून महाराजांना लोकोद्धाराचे कार्य पुढे करुन घ्यायचे होते त्यामुळे ज्या गुरुमाऊलीने त्यांना अशा निर्जन स्थानात पाटवले त्याच गुरुमाऊलीच्या प्रेरणेने हळू हळू भक्त मंडळी येऊ

लागली. बघता बघता नारेश्वरला भक्तीचा मळा फुलला. रेवा तीरे तपम् कुर्यात म्हणतात. नारेश्वर बापजींची तपोभूमि व लीलाभूमि झाली. अगणित दुःखी आर्त पिडीत जीवांचे दुःख इथे दूर झाले अजूनही होते आहे. त्यांनी मातृभक्तीचा थोर आदर्श सर्वांसमोर ठेवला. त्यांच्या दिवसाची सुरवातच मातृ दर्शनाने होई. बापजी शेवटपर्यंत माताजीच्या हातचेच अन्न ग्रहण करीत. ते कधीही आईच्या शब्दाबाहेर गेले नाहीत. केवळ आईच्या इच्छेखातर ते शेवटी शेवटी नारेश्वरमध्ये राहिले. मातृवियोग झाल्यावर प्रथम त्यांनी अन्न वर्ज्य केले. लवकरच त्यांनी नारेश्वरच्या मंदिरात मातृस्मारक बांधले. त्या बांधकामात त्यांनी स्वतः भाग घेतला. बापजींनी कोणाकडे भिक्षा मागितली नाही. कोणालाही दीक्षा दिली नाही. पण शिक्षा मात्र सर्वांना दिली. ते अद्वैत सिद्धांताचे पुरस्कर्ते होते. आपल्या गुरुंप्रमाणेच विपुल प्रासादिक ग्रंथरचना त्यांच्याकडून संस्कृत, मराठी, हिंदी, गुजराती भाषेत झाली. त्यांची अनेक संस्कृत स्तोत्रे समंत्रक व शीघ्रफलदायी आहेत. संदर्भासाटी वर यादी दिली आहे. मराटीतील श्रीगुरुचरित्र, श्रीदत्तमहात्म्य, व प पू श्रीयोगानंदविरचित श्रीगुरुमूर्ति चरित्र एकत्र करुन त्यांनी एकच ग्रंथ गुजरातीत लिहिला. चीन-पाकिस्तान युद्धात राष्टीय संरक्षण निधीची गरज भासल्यावर त्यांना त्यांच्या भेटीला येण्याचा खर्च न करता लोकांनी संरक्षण निधीला तो पैसा दिला तर ते त्यांचे कर्म कल्याण करणारे आहे असे जाहीरपणे कोणते कर्म आचरणीय, आदरणीय आहे याचा बोध दिला, त्या फंडासाटी पैसे व सोने जमा करुन दिले. तसेच नारेश्वर येथे रायफल चालवायचे शिक्षण देऊन क्षात्रतेज व्यक्त केले. परस्पर देवो भव हे नवे सूत्र त्यांनी जगाला दिले. ज्ञान व भक्तीद्वारा समाजाचे नीतीधैर्य उंचावण्याचे कार्य त्यांनी केले.

नारेश्वरला येण्यापूर्वी प्रथम गरुडेश्वरला जाऊन दर्शन करा असे अवधूतजी प्रत्येकाला सांगत. तसेच गुरुस्थानाची तक्रार करु नका. स्थानाला अनुकूल वागा असे त्यांचे सांगणे असे.

त्यांच्या शब्दात मंत्र सामर्थ्य आहे याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. त्यांचे श्रीदत्तनामसंकीर्तन हे कित्येक लोकांच्या रोजच्या उपासनेत आहे. दत्तबावनी हे स्तोत्र लाखो लोकांचे संकटमोचन शस्त्र आहे. आधि, व्याधि, उपाधि मधून सोडण्याचे अभय वचन दत्तबावनीमध्ये अवधूतजींनी दिले आहे. अक्षर ब्रम्हाची ती मूर्तिमंत प्रसादी आहे. अवधूतजींच्या प्रचंड तपाची शक्ती आहे. ती एक प्रचंड मंत्रशक्ती आहे. अवधूत परिवारामध्ये दत्तबावनी हा ॲटमबॉंब समजला जातो. ही ५.२.१९३५ रोजी साकार झाली.

फावल्या वेळांत दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा चा जप करायला सांगून एका ठिकाणी ते म्हणतात, कलीयुगात हे नाम फार मोटे साधन आहे. योगसाधनेने किंवा निष्काम कर्मयोगाने साक्षात्कार करुन घेणे कलीयुगात सोपे नाही. पण कोणीही हे नाम मात्र घेऊ शकतो. त्याला कोणत्याही नियमांचे किंवा शास्त्राचे बंधन नाही. म्हणून प्रत्येक श्वासात प्रतिश्वासात भगवंताचे नाम घ्या. बापजी निर्गुणात गेल्यावर त्यांच्या मूर्ति स्थापनेच्या वेळी श्रीगुरुमहाराज नारेश्वरला गेले होते. श्रीगुरुमहाराजांच्या आज्ञेने श्रींचेही नारेश्वरला दोन वेळा जाणे झाले एका प्रसंगी श्री पहाटे बापजींच्या स्नानाच्या वेळी नर्मदेवर स्नानाला गेले असता बापजी स्नान करुन परत येत असता त्यांच्या बरोबर एक अत्यंत तेजस्वी कुमारिका होती. नंतर समजले की ती साक्षात् नर्मदामाता होती.

बापजींचे एकमेव अंतरंग शिष्य-भक्त म्हणून कोसंब्याच्या श्री पंडितजींचा उल्लेख केला जातो. भापजींनी त्यांना स्वतः होऊन पादुका दिल्या असून त्यांची स्थापना कोसंब्याला श्री पंडितजींच्या स्थानात झाली आहे. श्री पंडितजी संगीतातले अत्यंत दर्दी होते. श्रीगुरुचरित्रात सांगितल्याप्रमाणे दत्तप्रभुंना गायनभक्ती अत्यंत प्रिय आहे. बापजी पंडितजींना घेऊन एकांतात जाऊन पंडितजींचे गायन भक्तीचा आनंद लुटत. बापजींच्या काव्याशिवाय पंडितजींनी इतर कोणतेही गायन कधी केले नाही.

बापजींचे मोदीकाका लिखित चरित्र गुजरातीत उपलब्ध आहे. बापजीचे सर्व वाङ्मय अत्यंत वाजवी दरात नारेश्वरला विक्रीस टेवले आहे. बापजींच्या व रुक्मांबांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या वास्तू आजही संस्थानने अतिशय उत्तम रीत्या जतन केल्या आहेत. संपूर्ण मंदिराचा परिसर अत्यंत रमणीय व स्वच्छ आहे. बापजी सगुणरुपाने तिथे राहात असताना जो नित्यक्रम होता तोच आजही अव्याहतपणे चालू आहे. भाविकांची राहाण्याची, भोजनाची चांगली सोय होते.

# प पू श्रीयोगानंद सरस्वती उर्फ गांडामहाराज

शके १८२० मध्ये श्रीमहाराजांचा मुक्काम शिनोरा येथे होता. तिथे गांडामहाराजांची व महाराजांची प्रथम भेट झाली. ते गुजराथी ब्राम्हण असून शिक्षण झाल्यावर कांही दिवस नोकरी केली पण नोकरीत त्यांचे मन रमले नाही म्हणून व्यापाराचे निमित्त करुन नर्मदा तीरावर राहून कोणी साधू सत्पुरुष भेटतो का पाहू लागले. पुढे ओंकारेश्वरला श्रीपांडुरंगमहाराजांनी त्यांना सद्‌गुरुंची प्राप्ती व्हावी म्हणून नेमावरला सिद्धनाथाच्या मंदिरात जपानुष्टान करण्यास सांगितले. ते केल्यावर त्यांना मोटया महाराजांची माहिती कळली व ते शिनो-याला आले. सुरवातीला ८ दिवस महाराजांनी गांडा कडे लक्षच दिले नाही तरीही ते न कंटाळता राहिल्यावर महाराजांनी त्यांची चौकशी केली. गांडामहाराजांनी आपली थोडक्यात हकिकत सांगून आपल्यावर कृपा करुन कृतार्थ करण्याची प्रार्थना केली. एका शंकराच्या देवळात राहायला सांगून योगाभ्यास करायचे मार्गदर्शन केले. परत कांही दिवसांनी मोटे महाराज तिथे परत आले. घरच्या मंडळींना गांडाबुवांचा कांहीच टावटीकाणा समजला नव्हता म्हणून घरी आईवडिलांना भेटून त्यांची क्षमा मागून व प्रेमाने त्यांची आज्ञा घेऊन मग मोटया महाराजांना द्वारकेत येऊन भेटायची आज्ञा केली. त्याप्रमाणे ते आईवडिलांना भेटून द्वारकेला आले. आईबापांनी त्यांना तरी अटी घातल्या- मरणाचे वेळी त्यांचे जवळ उपस्थित राहून त्यांचे और्ध्वदेहिक पार पाडणे आणि त्यांच्या मुलीचे लग्न लावून देणे. ह्या अटी ऐकल्यावर मोटे महाराज म्हणाले, कांही हरकत नाही, श्रद्धेप्रमाणे कार्यसिद्धी होऊन जाईल.

गांडाबुवांची मोटया महाराजांवर पूर्ण श्रद्धा होती. त्यानंतर ते शेवटपर्यंत मोटया महाराजांबरोबर राहिले. गरुडेश्वरला जाण्यापूर्वी मोटया महाराजांनी त्यांना भडोचला जाऊन तप करण्यास सांगितले. त्यावेळी मोटे महाराज त्यांना म्हणाले, माझ्या मागे असा तूं किती काळ फिरणार ? ब्रम्हदेवाचे आयुष्य मिळाले तरी कमी पडेल त्यापेक्षा नर्मदातीरावर जाऊन कुटे तरी स्थिर होऊन उपासना कर. त्याप्रमाणे गांडामहाराजांनी भरुचला जाऊन कुटे तरी स्थिर होऊन उपासना कर. त्याप्रमाणे गांडामहाराजांनी भरुचला जाऊन तप केले व मग परत मोटया महाराजांना भेटले. गोपेगांवला श्रीदत्तपादुकांची स्थापना करुन तिथे गांडाबुवांनी राहावे अशी मोटया महाराजांची इच्छा होती पण तिथल्या शेतक-याने जागा न दिल्याने तो योग आला नाही. पुढे मोटे महाराज समाधिस्थ झाल्यावर गांडाबुवा परभणी जिल्हयातील गूंज या गांवी येऊन राहिले. तिथे त्यांनी मोटे दत्तमंदिर बांधले व समाधि घेतली. गोदावरीच्या किना-यावर हे अगदी छोटे गांव आहे पण मंदिर मोटे भव्य असून संस्थानात आल्यागेल्याची उत्तम व्यवस्था आहे. रोज अन्नदान होत असते. फाल्गुन वद्य १३ ला मोटी यात्रा असते. गांडामहाराजांनी १५,००० ओव्यांचे १३५ अध्याय असलेले श्रीगुरुमूर्तीचरित्र मराटीत ओवीबद्ध केले आहे. त्यात कांही टिकाणी भाषेची अडचण आली तेव्हां श्रीरंगावधूतमहाराजांना मोटया महाराजांची आज्ञा झाली आणि ते गूंजला येऊन गांडामहाराजांना भेटले व त्यांना काय हवे ते मार्गदर्शन केले. या ग्रंथात योगानंदांनी मोटया महाराजांच्या चरित्राबरोबर आचारधर्महीं सर्व सामान्यांच्या उपयोगासाटी सांगितला आहे. या चरित्राची भाषा अतिशय सोपी व मधुर असून भक्तिभाव वाढवणारे व प्रासादिक आहे. मोटया महाराजांचा सर्वात जास्त सहवास त्यांना लाभला होता.

# प पू श्रीदीक्षितस्वामीमहाराज

यांचा जन्म कर्नाटकातल्या सदलगा गांवी चैत्र शु. प्रतिपदा इ स १८६६ रोजी झाला. त्यांचे मातापिता दोघेही मोटे दत्तभक्त होते. सुरवातीला जरी इंग्रजी शाळेत जाऊन शिक्षण घेतले तरी पुढे वडिलांच्या उपदेशाने त्यांनी शास्त्राध्ययनाला व शास्त्राचरणाला सुरवात केली. त्याच वेळी ईश्वरी संकेतप्रमाणे त्यांची मोटया महाराजांची भेट झाली व मोटया महाराजांनी त्यांची परिक्षा घेऊन चित्तशुद्धी झाल्यावर त्यांना संध्येपासून सर्व शिकवले. त्यावेळी मोटया महाराजांनी जो उपदेश केला तो असा :

“ नारायणा, मनुष्यदेह आत्मज्ञान संपादन करण्यासाटीच ईश्वराने निर्माण केला आहे. आत्मज्ञानाची इच्छा न करणारे भक्तीविहीन मनुष्य म्हणजे केवळ राक्षस होत. त्यांचे श्वासोच्छवास म्हणजे लोहाराचे भाते होत, त्यांचे जीवित व्यर्थ होय.”

“नारायणा, कल्याण व्हावे असे सर्वांनाच वाटते ते तसे वाटण्याला महत्व नाही. खरे कल्याण कोणते हे जाणून घेऊन त्याच्या ख-या साधनाला सुरवात करणे महत्वाचे आहे. वसिष्टांनी रामचंद्रांना उपदेश करताना सांगितले, योग्य अशा पौरुषप्रयत्नाने सर्व कांही मिळू शकते. योग्य म्हणजे शास्त्रीय प्रयत्न. पौरुष प्रयत्न म्हणजे मी ही गोष्ट या साधनाने अवश्य संपादन करीनच असा मानसिक उत्साह. तो उत्साह तूं धारण कर व त्या प्रयत्नांना

लाग. कोणत्याही गोष्टीची उत्कट इच्छा असल्याशिवाय ती गोष्ट साधत नाही. ज्ञानाचीसुद्धा तीव्र इच्छा पाहिजे. आत्मज्ञान व्हावे असे सगळेच म्हणतात पण ज्ञानयज्ञ सुरु झाला म्हणजे ते कंटाळतात. त्यांना तो श्रवणमनननिदिध्यासनादि ज्ञानयोग रुचत नाही. मग ती सामान्य जिज्ञासा काय कामाची ? उत्कट जिज्ञासाच अध्यात्मश्रवणी आवड उत्पन्न करते. ती आवड म्हणजे खरी ज्ञानेच्छा होय. तूं म्हणत होतास कर्मयोग निरुपयोगी आहे. पण तुझे मत कच्चे आहे. कर्मयोगसुद्धा मोक्षोपयोगीच आहे.''

मोक्ष म्हणजे अज्ञानभंग होय. तो जरी ज्ञानाने होत असला तरी ते ज्ञान शम, दम, वैराग्य इ. साधनचतुष्टय संपत्तीनेच मिळत असते. ती साधनसंपत्ती चित्तशुद्धि झाल्याशिवाय मिळत नाही. चित्तशुद्धि आश्रमोक्त कर्माचरणावाचून होत नाही. परंपरेने कर्म हे अशा त-हेने मोक्षाचे साधन होऊन राहिलेले आहे. कर्मयोग, भक्तियोग व ज्ञानयोग हे तीन योग परस्परांना सहाय्य होऊन अद्वैत ब्रम्हस्वरुपी मोक्षाची प्राप्ती करुन देतात. म्हणून कर्मयोग हाच मोक्षरुपी इमारतीचा पाया आहे असे समज.

नारायणा, तूं आज गृहस्थाश्रमी आहेस. तुझ्या आश्रमधर्माप्रमाणे तूं आपले कर्तव्य कर. ते तुला आम्ही शिकवू. कर्मे करताना ही कर्मे मी ईश्वराच्या आज्ञेने त्याचे आराधन म्हणून करीत आहे. चित्तशुद्धिव्दारा श्रीपरमेश्वराची प्रिती मला यांच्या योगे संपादन करायची आहे. दुसरे कोणतेच फल नकोय अशी बुद्धी ठेव. ईश्वराराधनबुद्धि ठेवून कर्म करणे यालाच कौशल्य म्हणतात. व हे कौशल्य संपादून केलेल्या आश्रमधर्माचरणालाच कर्मयोग अशी संज्ञा आहे. फलेच्छापूर्वक केलेल्या कर्माला ती संज्ञा नाही. स्वर्गादिक फलाकरता आचरलेले कर्म प्रापंचिकांचा कर्मयोग व मोक्षार्थ आचरलेले कर्म हा मुमुक्षुंचा कर्मयोग होय. या योगाचरणाने ब्राम्हीतनु बनते. मातीनेच जसे

मातीचे क्षालन होते त्याप्रमाणे अविद्याजन्य जड अशा कर्मानेच कर्म व अविद्या दोहोंचाही नाश होतो म्हणजे मोक्ष होतो.

मोटया महाराजांच्या आज्ञेप्रमाणे पंचमहायज्ञ, देवपूजा, अन्नदान, स्मार्तग्नीची उपासना अयाचित वृत्तीने करीत. प्लेगच्या साथीत त्यांची बायका मुले निवर्तल्यावर त्यांनी संन्यासदीक्षा घेतली. स्वतः मोटया महाराजांनी त्यांना दंड देऊन त्यांचे नृसिंहसरस्वती हे नांव टेवले. संन्यासधर्म शिकवला. उपनिषदे, पंचीकरण, वार्तिके वगैरेंचा अभ्यास करुन घेतला. मोटे महाराज वाडीत असतांना दीक्षितस्वामीमहाराज प्रातःस्नानाचे वेळी गंगेवर सोवळयाने गुरुमहाराजांना दंड, छाटी, कौपिन, भस्म, कटिसूत्र वगैरे स्वतः नेऊन देत. मटांत आल्यावर त्यांना आसन मांडित, त्यांच्यापुढे संध्येची पात्रे टेवीत. त्यांच्या दंडाला मुद्रा बांधत व त्यांच्या पुढे श्रीदत्तप्रभुंच्या अंगा-याची डबी टेवीत. भाष्याचे वेळेस ग्रंथ नेऊन त्यांना देत. स्वयंपाकाला लागणा-या वस्तू, भाजीपाला किंवा इतर सामान ते आणून देत. सज्जनांची उष्टे काढीत, शेण सारवीत, भांडी घाशीत, मटाची झाडलोट करीत, रांगोळया काढीत. पूजा साहित्य एकत्र टेवित. संध्या झाल्यावर तीर्थ गंगेत नेऊन टाकीत तसेच निर्माल्य देखिल शुद्ध जागेत टाकीत. कारणापुरते बोलणे, व्यवस्थित बसणे, थट्टा मस्करी न करणे, फार काय गुरुमुखाकडे एकाएकी न पहाणे असे मर्यादशील वर्तन त्यांचे असे. जसजसा गुरुप्रसाद त्यांच्यावर होत गेला तसतसे ते अधिकाधिक श्रद्धा भक्ती विनयसंपन्न होत गेले व आपल्या निरुपम सद्‌गुणांनी आपल्या गुरुंचे एकमेवाद्वितीय असे पट्टशिष्य झाले.

सद्‌गुरुभक्ती कशी असावी याचा बोध स्ववर्तनाने त्यांनी सर्व जगाला दिला. अष्टांगयोग शिकवला. देवाची सेवा हीच गुरुसेवा असे त्यांना सांगून मोटे महाराज संचारार्थ निघून गेले. दीक्षितस्वामीमहाराजांनी शेवटपर्यंत गुवज्ञिचे अत्यंत कसोशिने पालन केले. हे महाराजांचे एकनिष्ट भक्त. मितभाषी, शांत, एकांतप्रिय असून त्यांचा स्वभाव

अत्यंत प्रेमळ होता. कांही वर्ष गुर्वाज्ञेप्रमाणे वाडीत राहून पुढे समोरच्या तीरावरच्या अमरापूरमध्ये येऊन राहिले. तिथे त्यांनी त्या देवस्थानाचा जिर्णोद्धार करुन सर्व व्यवस्था लावली. मोटया महाराजांचे पुण्य स्मरण म्हणून श्रीवासुदेवानंदपीठाची तिथे स्थापना केली. मोटे महाराज भारतात संचारासाटी कुटेही असले तरी जे ग्रंथ लिहित ते दीक्षितस्वामींकडे पाठवित. ते छापून घेण्याचे काम दीक्षितस्वामी करीत. दीक्षितस्वामींनी श्रीवासुदेवमननसार नांवाचा गुरुशिष्यसंवादरुपी ग्रंथ जिज्ञासूंसाटी मुद्दाम लिहिला. त्यात सामान्यांपासून सर्वांनाच साधनामार्गाचे उत्तम मार्गदर्शन केले आहे. त्यांनी कांही संस्कृत स्तोत्रेही केली आहेत. मोटया महाराजांच्या पादुका अमरापुरात आहेत. दीक्षितस्वामींचा व मोटया महाराजांचा नियमित पत्रव्यवहार चालत होता. मोटया महाराजांना यांच्याबद्दल विशेष प्रेम होते. ते यांच्याबद्दल लोकांना सांगत, मी त्याला संध्येपासून सर्व शिकवले आहे. मला त्याचा अभिमान आहे. श्रृंगेरीच्या ब्रम्हानंदांना मोटे महाराज म्हणाले, आपण नृसिंहवाडीला कधी गेला होतात काय ? तेथे जीवनमुक्त लक्षणांची मूर्ती तुम्हाला पहायला मिळेल. आम्ही तिची तेथेच स्थापना केली आहे. यावरुन दीक्षितस्वामींची योग्यता कळून येते. अमरापुरात राहू लागल्यावर त्यांची व प पू श्रींची भेट झाली व श्रींना त्यांनी सुरवातीपासून आपले पट्ट शिष्य मानले. श्रींचा पहिला भागवत सप्ताह त्यांच्या वयाच्या १६व्या वर्षी दीक्षितस्वामींच्या समोर अमरापुरला झाला. यांनी अनेकांना भक्तीमार्गाला लावले. पुष्कळ टिकाणी संचार केला. गरुडेश्वरलाही दर्शन घेतले. शेवटी काशीयात्रा करुन ते अयोध्येला जाऊन राहिले. तिथेच त्यांनी अश्विन वद्य सप्तमी १८४९ १९२७ रोजी देह टेवला. जानेवारी १९९९ श्रींच्या आशिर्वादाने अमरापुरला गुरुभक्त श्री लाटयांनी पुढाकार घेऊन अतिशय भव्य मंदिर बांधले असून घाटही बांधून झाला आहे.

यांचे अतिशय सुंदर चरित्र श्रीशंकरस्वामींनी लिहिले आहे.

# प पू श्रीनानामहाराज तराणेकर

प पू. श्री नानांचा जन्म मध्यप्रदेशातील तराणे या गांवी सात्त्विक व संस्कारसंपन्न आचरण असलेल्या घराण्यात सन १८९६ साली झाला. त्यांना गुरुप्राप्तीची तळमळ लागल्यावर त्यांच्या पिताजीच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी श्रीगुरुचरित्र सप्ताह करायला सुरवात केली. त्या वेळी मोटया महाराजांचा मुक्काम ब्रम्हावार्ताला होता. शेवटचा ७वा सप्ताह फक्त पाण्यावर केला तो संपल्यावर मोटे महाराज ब्रम्हावर्ताहून नानांसाटी तराण्यात प्रगट झाले व त्यांनी नानांना दीक्षा देऊन कृतार्थ केले. या कृपेमुळे नानांच्याकडून प्रचंड तप झाले व त्यामुळे पुढील आयुष्यात या भागात दत्तभक्तीचा प्रसार करण्याची त्याचप्रमाणे भाविकांना भक्तीमार्गाचे मार्गदर्शन करण्याची मोटया महाराजांनी त्यांना आज्ञा केली. पुढे नानांनी अनेक तीर्थयात्रा केल्या त्यावेळी त्यांना पुष्कळ देवदेवतांची दर्शने झाली. नाना मथुरेला गेले असतां स्वतः श्रीकृष्णांनी त्यांना दर्शन देऊन आपल्या कमंडलुतले तीर्थ प्राशन करण्यास कसे दिले याचे सुंदर वर्णन त्यांच्या ''मार्तंड महिमा'' या चरित्रात केले आहे. त्यांनी सारे आयुष्य पारमार्थिक कल्याणासाटी वेचले. सतत संचार करुन भक्तीचा मळा फुलवला. त्यांना भक्तीरस असलेल्या भजनांची अतीव गोडी होती. खडया आवाजात भजन करुन ते भक्तांना मंत्रमुग्ध करीत. दया, क्षमा व शांती त्यांच्या रोमारोमात भरली होती तर कर्म, उपासना, ज्ञान, भक्ती व वैराग्य हे त्यांचे पंचप्राण होते. परमेश्वराच्या नामसंकिर्तनात एकदा रंगून गेले की ब्रम्हानंदी लागली टाळी कोण देहात सांभाळी ही उक्ती त्यांच्या बाबतीत सार्थ टरे. पुढे मोटया महाराजांनी वामनबुवांच्या रुपाने येऊन नानांना योगाभ्यास शिकवला. नानांनी अनेक संकटांना तोंड देत नर्मदापरिक्रमा पूर्ण केली. तेव्हां त्यांना अश्वत्थामा भेटला. त्या काळांत नर्मदामातेने त्यांना दर्शन दिले त

द्वारकेला साक्षात् द्वारकाधीशांनी आपल्या कमंडलूतले अमृत नानांच्या मुखात दोन थेंब टाकले. गिरनारवर नवनाथांनी दर्शन दिले. हिमालयात निरनिराळ्या सिद्धमहात्म्यांची भेट झाली. गरुडेश्वरला ते १९६१ सालपर्यंत पुण्यतिथीसाठी नियमितपणे जात असत. नानांनी टिकटिकाणी यज्ञयाग केले. अनेक साधु सत्पुरुषांची दर्शने घेतली. नाना १६ एप्रिल १९९३ रोजी वैशाख व.१० चैतन्यरुप झाले. नानांच्या उपदेशाचे सार –

घरातील अथवा बाहेरील सर्व व्यवहार जो प्रेमळपणे आणि सहृदयतेने करतो त्याला ईश्वर सदैव मदत करतो हे त्रिकालातीत सत्य आहे. जाणून बुजून तुम्ही कोणाला फसवलेत तर ईश्वर तुम्हाला शासन केल्याशिवाय राहाणार नाही. हृदयस्थ ईश्वर तुमच्या इच्छेप्रमाणे तुमचे बेत पार पाडीत असतो आणि तोच अंतःसाक्षी आहे. परंपरेने चालत आलेल्या कुलव्रतांचे आचरण केलेच पाहिजे. आयुष्यामध्ये यशस्वी होण्याकरता मनाचा समतोल साधता आला पाहिजे. यशाने धुंद न होता आणि दुःखाने खचून न जाता दोन्ही गोष्टी समभावनेने सहन करता आल्या पाहिजेत. दुस-याबद्दल राग, इर्षा, उद्वेग, वैर धरुन सोन्यासारख्या आयुष्याचा नाश करु नये. श्रद्धा टेऊन ईश्वराचे रुप आटवावे, तो अत्यंत कृपाळू आहे आणि तो आपल्या चरणकमली सहज स्थान देईल. ईश्वर नाम घेणे हा अत्यंत सोपा मार्ग आपल्या हातात परिसासारखा आहे व त्यामुळे आयुष्याचे कल्याण, सोने होते. आणि गुरु प्रसन्न झाल्यावर तर आपले जीवन परिसासारखे होते.

इंदोरला नानांचे निवासस्थान असून त्यातच मंदिरही आहे.

# प पू श्री सीताराम महाराज

सीताराम महाराजांचा जन्म माणगांवातच झाला. मोटया महाराजांच्या पावन सहवासात त्यांचे बालपण गेले. अध्ययन झाले. आपल्या बंधूंची योग्यता ते सुरवातीपासूनच ओळखून होते व त्यांच्या आज्ञेत राहात. त्यांची सेवा करीत. मोटे महाराज दत्तप्रभुंच्या आज्ञेने माणगांव सोडून गेल्यानंतर त्यांनी महाराजांच्या आज्ञेप्रमाणे बरीच वर्ष मातृसेवा केली. पुढे मोटया महाराजांप्रमाणेच यांनी गृहत्याग केला. त्यांना नरसोबावाडीत दत्तप्रभुंचे दर्शन झाले. नंतर त्यांनी  ग्वाल्हेरला कांही वर्ष राहून शास्त्राध्ययन केले. हरिद्वारला योगाभ्यास केला. मोटया महाराजांच्या दर्शनाच्या ओढीने सबंध देशभर शक्यतो पायीच संचार केला. अखेरिस ब्रम्हावर्ताला त्यांची व महाराजांची भेट झाली आणि सर्व श्रमांचे सार्थक झाले. महाराजांनी सीताराम महाराजांना कांही दिवस जवळ टेवून घेतले, मार्गदर्शन केले. तिथून निघून ते हिमालयात यात्रेला जाऊन परत आले. राजमहेंद्रित मोटया महाराजांची भेट झाली. तिथून परत मोटे महाराज पवनीला चातुर्मासानिमित्त राहिल्यावर पवनीला येऊन राहिले. परत महाराज वाडीत आल्यावर सीताराम महाराज वाडीत आले. त्यांना गुरुदर्शनाची व सहवासाची अत्यंत ओढ होती त्यामुळे जिथे मिळेल तिथे ते महाराजांचा सहवास घेत असत. त्यांचा स्वभाव जरी विनम्र असला तरी जात्याच मिश्किल होता. वेळ प्रसंगी प्रेमाने ते गुरुंशीहि मिस्किलपणे वागत आणि गुरुमहाराजही सीतारामांचा अधिकार, शुद्ध प्रेम पाहून क्षमा करीत. नाही तर महाराजांचा करारी स्वभाव, तपःसामर्थ्यच इतके होते कि सहसा त्यांच्याशी सलगी करायचा कोणाचा धीर होत नसे. वजूरला स्वाहाकार झाला तेव्हां सीतारामांनी अशीच गंमत केली. मोटया महाराजांनी वाडी सोडतना आपल्या प्रिय शिष्यांना म्हणजे प पू श्री दीक्षितस्वामी महाराजांना कांही झाले तरी वाडी

सोडायची नाही अशी आज्ञा केली होती व ती आज्ञा शिरसावंद्य मानत असत. असे असता राजूरला स्वाहाकाराच्या वेळी मोटया महाराजांनी तुम्हाला बोलावले आहे असे सांगून दीक्षित स्वामीना सीतारामांनी राजूरला बोलावले. गुरुंची आज्ञा म्हणून ते तिथे आले आणि त्यांना पहाताच मोटे महाराज किंचित नाराज झाले. हे कसे इथे आले असा मोटया महाराजांना प्रश्न पडला. सुरवातीला तर त्यांनी दीक्षितस्वामींच्याकडे पाहिले देखिल नाही पण सीतारामांनी गुरुंची क्षमा मागून सर्व उलगडा केला.

पुढे बारलिंग क्षेत्री त्यांची व मोटया महाराजांची शेवटची भेट झाली. महाराजांनी सीतारामांचे पूर्ण समाधान केले. तिथून ते हिंगोलीत आले. इथे त्यांचे दीर्घ वास्तव्य झाले. वेदाध्ययन जरी झाले असले तरी दत्तभक्ती त्यांच्यात पुरती मुरली होती. भजन करताना ते इतके रंगून जात की मोटया महाराजांनाही त्यांचे कौतुक केल्या शिवाय राहावत नसे. गुरुसेवेत ते अत्यंत तत्पर असत. गुरुसुश्रुषा करताना त्यांनी स्वतःच्या देहाचीसुद्धा परवा केली नाही. आपल्या गुरुंप्रमाणेच त्यांना पुत्रैषणा, दारैषणा, वित्तैषणा किंवा लोकेषणा यांपैकी कोणतीच एषणा नव्हती. वैराग्य, ज्ञान, भूतदया, इत्यादि गुणांमुळे ते जसे गुरुंच्या साम्यतेला गेले होते तसेच योगामध्येही तत्तुल्यच होते. मोटया महाराजांच्याप्रमाणेच हे देखिल लोकांना उपदेश देत, औषधे, मंत्र, यंत्र इत्यादि देऊन लोकांचे रोग, बाधा वगैरे दूर करीत. महाराजांचे प्रिय शिष्य दीक्षितस्वामी महाराजांवर सीताराम महाराजांचे फार प्रेम होते. वाडीला ते दीक्षितस्वामींच्या सहवासात मुद्दाम जाऊन राहिले होते. राजूरच्या स्वाहाकाराच्या नंतर त्यांनी कित्येक कर्जबाजारी लोकांना यज्ञसमाप्तीनंतर उरलेल्या द्रव्याने कायमचे ऋणमुक्त केले. हिंगोलीत हेमराज नांवाचा सावकार राहात होता. तो मोटया महाराजांचा निष्टावान भक्त होता. त्याला एका असाध्य रोगाने ग्रासल्यावर त्याची गुरुसेवा करायची आत्यंतिक इच्छा पूर्ण करण्यासाटी आपले १६ वर्षांचे आयुष्य सीताराम महाराजांनी त्या दिले. पुढे अमरावतीला एका वटवृक्षाखाली बसून किंचित् ज्वराचे निमित्त करुन सीताराम महाराजांनी शके

१८४० फाल्गुन शु.८ मी ला गुरुस्मरण करीत आपला अवतार समाप्त केला. यांनी विपुल वाङ.मयनिर्मितीही केली आहे.